दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १११ वा | शनिवार, दि. १३ जून २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## प्रतिबंधित इंजेक्शन रॅकेटचा भांडाफोड

**कर्जत :** मानवी आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या आणि डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय विक्रीस बंदी असलेल्या प्रतिबंधित औषधी इंजेक्शनच्या अवैध विक्रीवर मिरजगाव पोलिसांनी मोठी कारवाई करत ५८ हजार ६४० रुपये किमतीची एकूण ७७ इंजेक्शने जप्त केली आहेत. तरुणाईला व्यसनाच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रकारांवर पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत मिरजगाव पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी नियमित पेट्रोलिंग करीत होते. याचदरम्यान पोलिसांना गुप्त माहितीदारामार्फत माहिती मिळाली की, बाभूळगाव खालसा येथील पप्पू ऊर्फ प्रविण लाला भोसले हा प्रतिबंधित औषधी इंजेक्शनचा साठा विक्रीसाठी रोहन भाऊसाहेब लाढाणे (वय २२) याच्याकडे पाठवत आहे.


**आजचे हवामान**
कमाल 37°C | किमान 24°C

| पेट्रोल | डिझेल |
|---|---|
| 111.21 | 97.83 |

| सोने | चांदी |
|---|---|
| 1,46,777 | 2,33,692 |

# गुटखा रॅकेटवर थेट मकोका

## ■ आयुक्त तुकाराम मुंढे यांचे अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश ■ अवैध व्यापाराला रोखण्यासाठी एफडीएचा निर्णय




**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटीत अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थाचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट आदेश दिले आहेत.

भारताच्या संविधानाच्या कलम ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची आणि आरोग्यास अपायकारक पदार्थांच्या सेवनास प्रतिबंध करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला आणि अशा प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ हे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारे आहेत.

या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३० (२) (अ) अंतर्गत राज्यात अशा पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिबंध असूनही काही ठिकाणी या पदार्थांचा अवैध व्यापार पद्धतशीर, संघटित आणि आर्थिक फायद्यासाठी होत असल्याचे अंमलबजावणी यंत्रणांच्या निदर्शनास आले आहे.

अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या कारवायांमधून असे दिसून आले आहे की, काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहाय्यक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो. अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. त्यामुळे अशा कारवाया केवळ अन्नसुरक्षा उल्लंघनापुरत्या मर्यादित न ठेवता, पात्र प्रकरणांत संघटीत गुन्हेगारीच्या दृष्टीने तपासल्या जाणे अपेक्षित आहे.

> कायद्याचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांना कोणताही त्रास देणे हा उद्देश नाही. मात्र, सार्वजनिक आरोग्यास हानी पोहोचवून संघटीत पद्धतीने प्रतिबंधित अन्नपदार्थांचा व्यापार करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि नेटवर्क्सविरुद्ध कठोर, पुराव्यांवर आधारित आणि कायदेशीरदृष्ट्या कठोर कारवाई केली जाईल. प्रतिबंधित अन्नपदार्थांचा अवैध व्यापार हा केवळ अन्नसुरक्षा उल्लंघन नसून, यापुढे तो सार्वजनिक आरोग्याविरुद्धचा गंभीर संघटित गुन्हा म्हणून हाताळला जाईल.
>
> **– तुकाराम मुंढे, आयुक्त**

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण किंवा विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५९ अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण कारावासाची तरतूद आहे. कलम ६४ अंतर्गत पुनरावृत्ती झाल्यास वाढीव शिक्षेची तरतूद आहे. तसेच कलमे ३८ व ४१ नुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणी, शोध व जप्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. कलम ४२ अंतर्गत अभियोजन सुरू करण्याची प्रक्रिया नमूद आहे.

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत ''सतत चालणारी बेकायदेशीर कृती, संघटित गुन्हा आणि संघटित गुन्हेगारी सिंडिकेट याबाबत स्पष्ट तरतुदी आहेत. एखादा गुन्हा दखलपात्र असून तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षेस पात्र असेल, मागील दहा वर्षांत एकापेक्षा अधिक आरोपपत्रे दाखल झालेली असतील आणि न्यायालयाने त्यांची दखल घेतलेली असेल, तसेच दोन किंवा अधिक व्यक्ती आर्थिक लाभासाठी समन्वयाने कार्यरत असतील, तर अशा प्रकरणात मकोका लागू करण्याची पात्रता तपासून कारवाई करण्याचे तुकाराम मुंढे यांनी निर्देश दिले आहेत.

या निर्देशांनुसार, प्रतिबंधित अन्नपदार्थांशी संबंधित प्रत्येक अंमलबजावणी कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी आणि नामनिर्देशित अधिकारी यांनी मकोका लागू होण्याची (पान ४ वर)

## मर्यादेपलीकडचे कर्ज भरावेच लागेल?

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्रकार परिषदेत माहिती



### कर्जमाफीवरील वाद कायम राहणार?

सरकारच्या मते ही कर्जमाफी शेतकऱ्यांना दिलासा देणारी आहे, तर विरोधकांचा आरोप आहे की अटींमुळे अनेक लाभार्थी अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे कर्जमाफीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीनंतर किती शेतकऱ्यांना लाभ मिळतो आणि किती जणांना अडथळ्यांचा सामना करावा लागतो, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. त्याचवेळी एल निनोच्या संभाव्य संकटाच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या उपाययोजना किती प्रभावी ठरतात, हेही आगामी काही महिन्यांत स्पष्ट होणार आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**


**मुंबई :** राज्यातील ज्या शेतकऱ्यांना यापूर्वी वारंवार कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे, त्यांनाही यावेळी मदत दिली जाणार आहे. मात्र, ठरावीक मर्यादेपर्यंतच कर्ज माफ करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम संबंधित शेतकऱ्यांनी भरावी लागेल. अन्यथा सहकारी बँकांची आर्थिक स्थिती डळमळीत होऊन संपूर्ण बँकिंग व्यवस्था धोक्यात येऊ शकते, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग १२ वर्षे पंतप्रधानपद भूषविल्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफी, शेतीसमोरील आव्हाने आणि आगामी एल निनोच्या परिणामांबाबत (पान ४ वर)

## राज्यातील सर्व दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राज्यातील महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली सर्व दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. १२ जून २०२६ रोजी याबाबतचा अधिकृत शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका १९५२ देखील आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.



### कैद्यांची जिल्हा कारागृहात रवानगी होणार?

राज्यात महसूल विभागाच्या नियंत्रणात एकूण ११६ दुय्यम कारागृहे आहेत. मात्र, गृह आणि महसूल विभागाच्या संयुक्त अभ्यासानंतर असे समोर आले की, या ११६ पैकी केवळ ३६ कारागृहे सध्या कार्यरत असून तब्बल ८० कारागृहे आधीपासूनच बंद अवस्थेत आहेत. जे ३६ तुरुंग सुरू आहेत, त्यांचीही अवस्था अत्यंत दुरवस्थेत आणि बिकट झाली आहे. या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या विशेष अभ्यासगटाच्या शिफारशींनुसार हा बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

दुय्यम कारागृहांमध्ये सध्या बंदिस्त असलेल्या कैद्यांना संबंधित जिल्ह्यातील मुख्य जिल्हा किंवा मध्यवर्ती कारागृहामध्ये तात्काळ हलवण्याचे आदेश गृह (कारागृह) विभागाला देण्यात आले आहेत. दुय्यम तुरुंगांच्या व्यवस्थापन आणि खर्चासाठी (वेतन,वीज, पाणी, आहार इत्यादी) वापरले जाणारे २०५६, ००५३ हे मुख्य लेखाशीर्ष पुढील आर्थिक वर्षापासून पूर्णपणे बंद करण्यासाठी वित्त विभागाला विनंती करण्यात येणार आहे.

### ही पदे होणार वर्ग

दुय्यम कारागृहांसाठी गृह विभागाची लिपिक संवर्गातील (वर्ग-३) एकूण ६ मंजूर पदे आहेत. ही पदे सध्या श्रीरामपूर (अहिल्यानगर), महाड (रायगड), मालेगाव (नाशिक), तळोदा (नंदुरबार), कराड (सातारा) आणि उदगीर (लातूर) येथे आहेत. ही सर्व पदे संबंधित कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालयाकडे वर्ग करण्यात येणार आहेत. हा निर्णय महसूल आणि गृह विभागाच्या संयुक्त बैठकीनंतर आणि गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आला असून,यावर सह सचिव अजित देशमुख यांची डिजिटल स्वाक्षरी आहे.

## ‘राजहंस’चा सौर ऊर्जा प्रकल्प कौतुकास्पद

### माजी मंत्री बाळासाहेब थोरात; दररोज १३५० किलोवॅट वीज निर्मिती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** दूध हे महत्त्वाचे अन्न आहे. दुधाची शुद्धता आणि गुणवत्ता जपल्याने राजहंस चे राज्यभरात मोठे नाव आहे. दूध संघाचा विजेवरील होणारा खर्च टाळण्यासाठी राजहंस दूध संघाने टाटा कंपनीच्या समन्वयातून उभारलेला सौर ऊर्जा प्रकल्प कौतुकास्पद असून दररोज १३५० किलोवॅट वीज निर्मिती होणार असल्याचे प्रतिपादन दूध संघाचे मार्गदर्शक तथा राज्याचे माजी कृषी व महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघात सौर ऊर्जा प्रकल्पाच्या शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख हे होते.

तर व्यासपीठावर आ. सत्यजित तांबे, (पान ४ वर)

> दूध संघाने अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवला असून पुढील अडीच वर्षांमध्ये या प्रकल्पाचा खर्च वसूल होणार आहे. विजेवरील खर्चात मोठी बचत होऊन त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. सौर ऊर्जा प्रकल्प प्रत्येकाने करावा असा हा उपक्रम असून या प्रकल्पाबाबत सरकारची काही चुकीचे धोरण आहे. याकडे लक्ष वेधावे लागणार आहे.
>
> **– सत्यजित तांबे, आमदार**

## कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करा

### आ. रोहित पवार; पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन सुरू




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पंढरपूर :** महायुती सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीतील जाचक अटी व शर्ती तात्काळ रद्द करून राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला विनाअट सरसकट कर्जमाफी द्यावी. शेतकऱ्यांच्या हक्काच्या इतर मागण्या पदरात पाडून घेतल्याशिवाय पंढरपुरातून मागे हटणार नाही, अशी आक्रमक भूमिका आ. रोहित पवारांनी सरकारविरोधात घेतलेली आहे.

सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी काल पंढरपुरातील छत्रपती शिवाजी (पान ४ वर)

> विरोधक आणि माध्यमांच्या दबावामुळे दिलेला बैल आजारी निघाला, आता त्याच्या उपचारासाठी शेतकऱ्यालाच स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागत आहे. कर्जमाफीच्या बाबतीतही सरकारने अशीच भूमिका घेतली असून अटी-शर्तींचा बोजा टाकून शेतकऱ्यांना मदतीपासून दूर ठेवले जात आहे. अन्नदात्याला मदत करायची असेल तर ती मनापासून करा, कारण तिजोरी ही जनतेची आहे.
>
> **– रोहित पवार, आमदार**

## शक्ती, बुद्धी, सामर्थ्य यांचा सदुपयोग म्हणजे परमार्थ

### महंत मंडलिक महाराज; कोल्हार येथे ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** जीवनात माणसाला लाभलेली शक्ती, बुद्धी, सत्ता, संपत्ती आणि सामर्थ्य ही केवळ वैयक्तिक लाभासाठी नसून समाजहितासाठी वापरली गेली पाहिजे. या सर्वांचा योग्य, संयमी आणि लोककल्याणाच्या दृष्टीने केलेला उपयोग म्हणजेच खरा परमार्थ होय, असे प्रतिपादन ह.भ.प. महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.

श्री क्षेत्र कोल्हार भगवतीपूर येथे (पान ४ वर)

### सांगता सोहळ्यास मान्यवरांची हजेरी

डॉ. भास्करराव खर्डे, ॲड. सुरेंद्र खर्डे, सयाजी खर्डे, साहेबराव दळे, संपत कापसे, अजित मोरे, नंदू मामा खांदे, रावसाहेब खर्डे, संभाजी देवकर, नितीन कुंकुलोळ, नंदकुमार भटेवरा, पुरुषोत्तम हिरानंदानी, संजय शिंगवी, श्रीकांत खर्डे, ऋषिकेश खांदे, पंढरीनाथ खर्डे, वसंत खर्डे, शरद खर्डे, अमोल थेटे, सुजित राऊत, श्याम गोसावी, पत्रकार गणेश सोमवंशी, विजय डेंगळे, तुषार बोऱ्हाडे, महेश फलटणे, रंभाजी बोरुडे, सुनिल बोरुडे यांच्यासह आदी मान्यवर व भाविक उपस्थित होते.

## कारखाना कर्मचाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी :** राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी परिसरातील डॉ. तनपुरे साखर कारखाना कामगार वसाहतीमध्ये काल दुपारच्या सुमारास एका ५७ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळासाहेब तारडे (वय ५७) हे डॉ. तनपुरे साखर कारखान्यात कर्मचारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी त्यांच्या राहत्या घरासमोरील झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ राहुरी पोलिसांना माहिती दिली.

घटनास्थळी पोलीस हवालदार बाबासाहेब शेळके यांनी तातडीने भेट देत रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने बाळासाहेब तारडे यांना उपचारासाठी जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. (पान ४ वर)

## संमिश्र

### इराणसोबतचे युद्ध आज संपले : ट्रम्प

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी दावा केला की अमेरिकेने इराणसोबतचे युद्ध संपवले आहे. एका व्हर्च्युअल रॅलीत ट्रम्प यांनी आपल्या समर्थकांना ही गोष्ट सांगितली. त्यांनी असाही दावा केला की इराण कधीही अणुबॉम्ब बनवणार नाही. इराणने ट्रम्प यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघई यांनी सांगितले की, शांतता करारावर अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. यापूर्वी ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांना सांगितले होते की, सर्वोच्च नेते मुजतबा खामेनी यांनी नवीन कराराला मंजुरी दिली आहे. त्यांनी असेही सांगितले की, इराणसोबतच्या शांतता करारावर याच आठवड्यात युरोपमध्ये स्वाक्षरी होऊ शकते.

### २०० लिटरपेक्षा जास्त डिझेल नाही

**नवी दिल्ली :** सामान्य ग्राहक एका दिवसात जास्तीत जास्त २०० लीटर डिझेलच खरेदी करू शकतील. हे डिझेल पुन्हा विकण्यावर पूर्णपणे बंदी असेल. याशिवाय, आता कारखाने आणि व्यावसायिक वापरकर्त्यांना किरकोळ विक्री केंद्रातून इंधन मिळणार नाही. केंद्र सरकारने ११ जून २०२६ रोजी याबाबत आदेश जारी केला आहे. आता या मोठ्या ग्राहकांना केवळ मोठ्या प्रमाणात विक्री करणाऱ्या ठिकाणांहूनच इंधन खरेदी करावे लागेल. देशाच्या काही भागांमध्ये किरकोळ पंपांवर अचानक वाढलेली असामान्य विक्री लक्षात घेऊन सरकारने हे पाऊल उचलले आहे. ही बंदी सुरुवातीला ९० दिवसांसाठी लागू करण्यात आली आहे.

### शरद पवारांचा जामीन अर्ज फेटाळला

**अहिल्यानगर :** किशोर महादेव परभणे यांना अमानूष मारहाण केल्याच्या कारणामुळे न्यायालयीन कोठडीत असलेले खा. निलेश लंके यांचे कट्टर समर्थक चिंचोडी पाटीलचे सरपंच शरद खंडू पवार याचा जामिन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. सोशल मिडीयावर व्हीडीओ पोस्ट केल्याचे कारणाने किशोर महादेव परभणे यांचे अपहरण करुन, खोलीत डांबून ठेवत अमानुष मारहाण केल्याची घटना घडली होती. प्रणव विजय मोरे, शदर खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.



# पाथर्डी-शेवगावला मिळणार मुबलक पाणी

## आ. मोनिका राजळेंची जायकवाडी पाणीपुरवठा कामांची पाहणी; अंतिम टप्प्यातील कामांना गती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी आणि शेवगाव शहरांच्या वाढत्या पाणीगरजा लक्षात घेऊन राबविण्यात येत असलेल्या जायकवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामांना आता वेग आला आहे. योजनेची कामे अंतिम टप्प्यात असून ती पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर दोन्ही शहरांतील नागरिकांना नियमित, मुबलक आणि दाबाने पाणीपुरवठा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास आ. मोनिका राजळे यांनी व्यक्त केला.

जायकवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि काम करणाऱ्या यंत्रणांच्या प्रतिनिधींसह जायकवाडी येथे प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी योजनेतील विविध टप्प्यांवरील कामांची माहिती घेतली तसेच अडचणी समजून घेऊन त्या तातडीने दूर करण्याच्या सूचना दिल्या.

या पाहणीवेळी पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, डॉ. मृत्युंजय गर्जे, बजरंग घोडके, अमोल गर्जे, ॲड. प्रतीक खेडकर, डॉ. जगदीश मुने, प्रतीक नांगरे, अजय भंडारी, संजय भागवत, संजय देशमुख, सुभाष बोरुडे, अजिनाथ मोरे, संदीप पवार, धनंजय चितळे, मनीषा उदमले, वंदना टेके, ज्योती शर्मा, सचिन वायकर, बबलू खोर्दे यांच्यासह पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे आणि शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे उपस्थित होत्या.

पाहणीदरम्यान आ. राजळे यांनी जायकवाडी योजनेतील जॅकवेल, पाइपलाइन आणि अन्य आवश्यक कामांचा सविस्तर आढावा घेतला. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या तांत्रिक तसेच प्रशासकीय अडचणींबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले. तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करता ठरलेल्या वेळेत काम पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी संबंधितांना दिले.

आ. राजळे म्हणाल्या, पाथर्डी आणि शेवगाव या दोन्ही शहरांचा विस्तार वेगाने होत आहे. वाढती लोकसंख्या, नवीन वसाहती आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन या योजनेची क्षमता वाढविण्यात आली आहे. प्रत्येक नागरिकापर्यंत नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी पोहोचणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.



जायकवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर ही पाण्याची तूट मोठ्या प्रमाणात भरून निघणार असून पाथर्डी आणि शेवगावकरांना दीर्घकालीन दिलासा मिळणार आहे.

शेवगाव योजनेसाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या काही आवश्यक परवानग्या प्रलंबित आहेत. त्या मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून संबंधित विभागांच्या समन्वयातून उर्वरित प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे आ. राजळे यांनी सांगितले.

> पाथर्डी आणि शेवगाव शहरांसाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर या योजनेमुळे कायमस्वरूपी तोडगा निघण्याची अपेक्षा आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणा यांच्या समन्वयातून ही योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.
>
> **– मोनिका राजळे, आमदार**

# निंबळकमध्ये महिला आरोग्य शिबिर उत्साहात

## गर्भवती मातांची मोफत तपासणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन आणि सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच सौ. प्रियंका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुलभा पवार यांनी मासिक पाळी स्वच्छता, महिलांचे आरोग्य, रक्तक्षय, स्त्रीरोगविषयक समस्या तसेच महिलांमध्ये आढळणाऱ्या विविध आरोग्यविषयक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच हिमोग्लोबिन तपासणी करून आवश्यक आरोग्य सल्ला देण्यात आला.

या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके, सामाजिक कार्यकर्ते हर्षल आगळे, डॉ. अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# वीटभट्ट्यांसाठी मुळा धरणातून माती उपसा

## शेतकऱ्यांच्या पिकांचे होतेय नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील म्हैसगाव परिसरातील आग्रेवाडी व चिखलठाण, दरडगाव थडी भागात मुळा धरणातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने धरण क्षेत्रातील जमीन उघडी पडली आहे. या जमिनीवर अनेक शेतकऱ्यांनी शेती करण्यास सुरुवात केली असून विविध पिकांची लागवड करण्यात आली आहे. मात्र काही ठिकाणी वीटभट्ट्यांसाठी तसेच शेतीची मशागत करण्याच्या नावाखाली जेसीबी, ट्रॅक्टरच्या साह्याने मोठ्या प्रमाणात माती उपसा सुरू असल्याचे दिसून येत आहे.



रॉयल तिच्या नावाखाली खुप कमी रॉयल्टी काढायची माती जास्त उपसायचे हा प्रकार मोठ्या प्रमाणात चालू आहे. माती उपसण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व वाहने शेतातील पिकांच्या जवळून ये-जा करत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत नष्ट होत आहे. पाहिले पिके कमी होऊ देणे गरजेचे होते. परंतू तेही होऊ दिले नाही. काही ठिकाणी माती काढताना शेजारील शेतांमध्ये माती साचत असून उभ्या पिकांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, माती उपसा करणाऱ्यांकडून योग्य खबरदारी घेतली जात नसल्याने पिकांची नासाडी होत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी संबंधित प्रशासनाने तातडीने पाहणी करून माती उपशावर नियंत्रण ठेवावे व नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, धरण परिसरातील माती उपसा नियमांनुसार होत आहे का नाही शासनाकडून रॉयल्टी घेतली का नाही हे सर्व ही गुलदस्त्यात आहे माती उपसण्याचा अधिकार शासनाने दिला आहे की नाही, याची चौकशी करून संबंधित विभागाने आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# चॅप्टर केसेसमध्ये पोलिसांचा दणका

## गुन्हेगारांकडून ९० हजारांची रक्कम शासन जमा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** प्रतिबंधक कारवाईनंतर चांगल्या वर्तणुकीसाठी घेतलेल्या बंधपत्राचा भंग करणाऱ्या तीन जणांविरुद्ध कारवाई करत त्यांच्याकडून एकूण ९० हजार रुपयांची अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. भविष्यात गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा आणि शांतता व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी श्रीरामपूर विभागातील पोलिसांनी ही कारवाई केली.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर यांना कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६, १२७, १२८ व १२९ अंतर्गत चॅप्टर केसेस तसेच बंधपत्र घेण्याची कार्यवाही त्यांच्या समक्ष केली जाते.

श्रीरामपूर विभागातील विविध पोलीस ठाण्यांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांविरुद्ध चांगल्या वर्तणुकीसाठीचे प्रस्ताव कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आले होते. चौकशीनंतर संबंधित व्यक्तींकडून शांतता राखण्याबाबत जामीनदारासह अंतिम बंधपत्र करून घेण्याचे आदेश देण्यात आले होते.

या बंधपत्रामध्ये बंधपत्राच्या कालावधीत कोणताही दखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हा करणार नाही, कोणाच्या मूलभूत हक्कांना बाधा पोहोचेल असे कृत्य करणार नाही, शरीराविरुद्ध किंवा मालमत्तेविरुद्ध गुन्हा करणार नाही, तसेच सुनावणीच्या वेळी नियमित हजर राहील अशा अटी नमूद करण्यात आल्या होत्या.

मात्र बंधपत्राच्या कालावधीतच पुन्हा गुन्हे केल्याने संबंधितांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९१ अन्वये बंधपत्र उल्लंघनाची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार पुढील कारवाई करत अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली.

कारवाई करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये शनिशिंगणापूर पोलीस ठाणे हद्दीतील नितीन राशिनकर (रा. रस्तापूर, ता. नेवासा) यांच्याकडून ५० हजार रुपये, सोनई पोलीस ठाणे हद्दीतील अक्षय रामदास चेमटे (रा. घोडेगाव, ता. नेवासा) यांच्याकडून ३० हजार रुपये आणि आश्वी पोलीस ठाणे हद्दीतील फिरोज नवाज शेख (रा. शेडगाव, ता. संगमनेर) यांच्याकडून १० हजार रुपये शासन जमा करण्यात आले आहेत. या कारवाईसाठी सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके आणि आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी प्रस्ताव सादर केले होते. बंधपत्राची रक्कम न भरल्यास संबंधितांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्याची तरतूद असल्याची माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.

# आ. जगतापांच्या वाढदिवसानिमित्त विकासकामांची भेट

## प्रभाग क्र. २ च्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : नगरसेविका त्र्यंबके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक २ मध्ये आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संदेशनगर व परिसरातील चौक सुशोभीकरण,श्रीराम चौक ते वसंत टेकडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभीकरण अशा विविध विकास कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनी त्रंबके यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. या प्रसंगी नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, सुजाता शिंदे,सुरेखा बनकर, राजश्री पिंपळे, भास्कर चेमटे,किशोर वाणे,महेश टाक, गोरक्षनाथ आव्हाड, वैभव पोकळे, विद्याधर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

प्रभागातील रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि मूलभूत विकासकामांना प्राधान्य देत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. श्रीराम चौक ते वसंत टेकडी हा परिसर दाट लोकवस्तीचा असून या रस्त्याच्या सुशोभीकरणामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्याबरोबरच परिसर अधिक आकर्षक आणि सुस्थितीत दिसणार आहे. आ. जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरात विविध विकासकामे वेगाने मार्गी लागत असल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत आमदार संग्राम जगताप आणि नगरसेविका त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, यांचे आभार मानले. परिसराच्या विकासासाठी अशाच प्रकारे सातत्याने कामे सुरू राहावीत, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली.



> आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना विकासकामांची भेट देणे हीच त्यांना खरी शुभेच्छा ठरणार आहे. यावेळी नगरसेवक निखिल वारे म्हणाले शहराच्या प्रत्येक भागात दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, रस्ते सुस्थितीत राहावेत आणि नागरिकांचे जीवनमान उंचावावे यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील डॉ. सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २ मध्ये अनेक विकासकामे हाती घेण्यात आली असून भविष्यातही नागरिकांच्या गरजांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.
>
> **– रोशनी त्र्यंबके, नगरसेविका**

# नेवासेत भक्तीचा महापूर

## २ लाख भाविकांनी घेतले माऊलींच्या 'पैस' खांबाचे दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** अधिक पुरुषोत्तम मास पर्वकाळात आलेल्या ज्येष्ठ वद्य 'कमला एकादशी'च्या पावन निमित्ताने गुरुवारी नेवासा येथील ऐतिहासिक श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात भक्तीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. ज्ञानेश्वरी माऊलींच्या पवित्र 'पैस' खांबाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे दोन लाख भाविकांनी दिवसभरात मंदिरात हजेरी लावली. शेकडो दिंड्यांच्या आगमनाने आणि ज्ञानोबा माऊली तुकारामच्या अखंड जयघोषाने संपूर्ण नेवासा नगरी दुमदुमून गेली होती.

एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर पहाटे मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलींच्या 'पैस' खांबाला यजमानांच्या हस्ते वेदमंत्रांच्या जयघोषात पारंपरिक पद्धतीने महाअभिषेक घालण्यात आला. याप्रवेळी आदिनाथ महाराज पांगरे, जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, संतसेवक दामोदर पवार यांच्यासह अनेक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाऊली खेळत आणि टाळ-मृदंगाच्या गजर करत आलेल्या हजारो वारकऱ्यांचे व दिंडी प्रमुखांचे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानतर्फे जंगी स्वागत करण्यात आले. संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग, विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, रामभाऊ जगताप, विश्वासराव गडाख, भिकाजी जंगले, कृष्णाभाऊ पिसोटे आणि कैलास जाधव यांनी सर्व दिंडी चालकांचा श्रीफळ व प्रसाद देऊन यथोचित सन्मान केला.

वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे सुश्राव्य हरि कीर्तन संपन्न झाले. या कीर्तना श्रवणासाठी हजारो भाविकांची उपस्थिती होती. कीर्तनाची सांगता झाल्यानंतर संस्थानच्या वतीने उपस्थित सर्व भाविकांना साबुदाणा खिचडीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# पाथर्डीत कपास कांती अभियानाला प्रारंभ

## कापूस उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** भारत सरकारच्या केंद्र पुरस्कृत कपास कांती कापूस उत्पादकता अभियानाची पाथर्डी तालुक्यात सुरुवात करण्यात आली असून, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिकांचा लाभ मिळणार आहे. सन २०२६-२७ पासून राबविण्यात येणाऱ्या या अभियानासाठी पात्र शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवर तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे यांनी केले आहे.

### उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर भर

कपास कांती अभियानातून कापूस उत्पादन व उत्पादकता वाढविणे, सघन लागवड तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे, अति लांब धाग्याच्या कापसाच्या लागवडीला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक हवामान परिस्थितीनुसार उपाययोजना राबविणे यावर भर दिला जाणार आहे.

कापूस उत्पादनात वाढ करणे, शेतकऱ्यांना आधुनिक लागवड पद्धतींची माहिती देणे आणि उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पन्न मिळवून देणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. केंद्र सरकारने कपास कांती अभियानाला मंजुरी दिली असून हे अभियान सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत पाथर्डी तालुक्यात कापूस पिकासाठी सघन लागवड पद्धत, जवळील अंतरावरील लागवड तंत्रज्ञान तसेच एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींची प्रात्यक्षिके घेण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून कापसाची उत्पादकता वाढविण्यास मदत होणार आहे.

या अभियानाचा लाभ घेण्यासाठी सहभागी शेतकऱ्यांकडे कृषी ओळख क्रमांक (ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी) असणे बंधनकारक राहणार आहे. तसेच शेतकरी गट, एफपीओ आणि सहकारी संस्थांना विहित नमुन्यात हमीपत्र सादर करावे लागणार आहे.

# अजितदादांनी विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवली

## बारस्कर; राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त सिव्हिल हॉस्पिटल व कुष्ठधाम येथे फळे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नेहमीच सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. पक्षाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना न्याय मिळावा, त्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचावेत आणि विकासाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने काम केले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर याबी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त अजित पवार गटाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सिव्हिल हॉस्पिटल आणि कुष्ठधाम येथील रुग्णांना विविध प्रकारच्या फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. पक्षाचा वर्धापन दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि उपचार घेत असलेल्या रुग्णांमध्ये जाऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रुग्णांची विचारपूस करत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली तसेच लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, मयूर बांगरे, महेश तवले, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, सुरज कोतकर, सुरज शिंदे, गणेश बारस्कर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान पक्षातील विविध पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देत पक्षाच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि सर्वसामान्य नागरिकांप्रती असलेली संवेदनशीलता जपत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुढील काळातही विविध लोकहिताचे उपक्रम राबविणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



> राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल ही केवळ राजकारणापुरती मर्यादित नसून सामाजिक उत्तरदायित्व जपणारी आहे. राज्यभर मजबूत संघटन उभी करून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. त्यांच्या विचारांवर चालत पक्षाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील. पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम राबवून सिव्हिल हॉस्पिटल व कुष्ठधाम येथील रुग्णांना विविध प्रकारची फळे वाटप करण्यात आली आहे.
>
> **– संपत बारस्कर, शहर जिल्हाध्यक्ष**

# नगर जिल्ह्यात २६ टक्के जलसाठा शिल्लक

## आरक्षित पाणीसाठ्यांच्या सुरक्षेसाठी तहसीलदारांची पथके



### ३१ ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी पाणी आरक्षित

मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्यात आले असून, त्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. पाणीउपसा होणार नाही या दृष्टीने जलसंपदा विभागाचे पथक कार्यरत आहे. सध्या आवर्तन सुरू आहे. कालव्यावरील उपसा रोखण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे, बॅकवॉटरजवळील गावांकडून होणारा उपसा बंद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

**जनता आवाज वृतसेवा**

**अहिल्यानगर** : एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस लांबणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने धरणातील पाणीसाठे ३१ ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी आरक्षित केल्याचे जाहीर केले आहे. आरक्षित जलसाठ्यातून आता अनधिकृत उपसा रोखण्यासाठी तहसीलदारांची पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याचबरोबर आवर्तन काळात वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांतून सुमारे २६ टक्के जलसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी तो ४० टक्के होता.

तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील पथकांमध्ये पाटबंधारे, महावितरण, पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. पथकांकडून अद्याप कारवाई सुरू करण्यात आलेली नाही. जिल्ह्यात मुळा, भंडारदरा व निळवंडे ही मोठी धरणे, तर आढळा, मांडओहळ, घाटशीळ पारगाव, घोड, सीना, खैरी, विसापूर, मुसळवाडी, टाकळीभान असे मध्यम प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांची एकूण साठवणक्षमता ५७ हजार ४५८ दलघफू इतकी आहे. सध्या या प्रकल्पांतून १४ हजार ६०३ दलघफू पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेला २३ हजार २२० दलघफू पाणीसाठा शिल्लक होता.

वाढत्या उन्हामुळे धरणातील जलसाठे घटू लागले आहेत. पाऊस लांबणार असल्याने ३१ ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहेत. आता आरक्षित पाणीसाठ्यातून बेकायदा उपसा होऊ नये यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली पथके स्थापन करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. मोठ्या व मध्यम प्रकल्पातील साठे झपाट्याने कमी होत असतानाच गाव तलाव, पाझर तलाव, कूपनलिका कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे टंचाईचे सावट अधिक गडद होताना दिसत आहे.

# ‘आम्ही ७५० ढापे मोजून दाखवू; विरोधकांनी ४ हजार कोटींचा विकास दाखवावा’

## नगराध्यक्ष पराग संधान यांचे विरोधकांना खुले आव्हान

**जनता आवाज वृतसेवा**

**कोपरगाव** : नगरपालिकेतील ढापे प्रकरणावरून सुरू असलेल्या आरोपांना नगराध्यक्ष पराग संधान यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ‘‘आम्ही शहरात बसविण्यात आलेल्या साडेसातशे ढाप्यांचा एक-एक हिशोब देण्यास तयार आहोत. मात्र विरोधकांनी त्यांच्या कार्यकाळातील ४ हजार कोटी रुपयांचा विकास जनतेला दाखवून द्यावा,’’ असे खुले आव्हान त्यांनी दिले.



**आरोपांना प्रत्युत्तर**

विरोधकांना सत्ता परिवर्तन आजही मान्य नसल्याची टीका करत संधान म्हणाले, की जनतेने त्यांच्या कारभाराचे मूल्यमापन करूनच त्यांना नाकारले आहे. ‘‘विरोधकांनी नगरपालिकेत यावे, आम्ही प्रत्यक्ष ढापे मोजून दाखवू. मात्र त्यांनीही विकासकामांचा हिशोब जनतेसमोर मांडावा,’’ असे त्यांनी स्पष्ट केले.

नगरपालिका हद्दीतील बंद पडलेली अनेक कामे पुन्हा सुरू करण्यात आली असून आपल्याला कोणतेही श्रेय घ्यायचे नसून जनतेची कामे करायची आहेत, असेही त्यांनी सांगितले. शहरात स्वच्छ पाणीपुरवठा सुरू झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला.


आचारसंहितेमुळे काही कामे रखडली होती. मात्र लवकरच सर्व प्रक्रियांची पूर्तता होऊन ७५० ढाप्यांचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करण्यात येईल, असे संधान यांनी सांगितले. तसेच विरोधकांनी आरोपांपेक्षा विकासकामांवर बोलावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

# श्री स्वामी समर्थ पालखीचे आगमन

**जनता आवाज वृतसेवा**

**श्रीरामपूर**- श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी व पादुका परिक्रमाचे सोमवार, दि. १५ जून रोजी श्रीरामपूर नगरीमध्ये भव्य आगमन होणार असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट व स्वामी भक्त परिवाराने दिला आहे.

सालाबादप्रमाणे या २८ व्या वर्षीही श्री स्वामी समर्थ ट्रस्ट अक्कलकोट या संस्थानने पादुका व पालखी परिक्रमांचे आयोजन केले आहे. पालखीचे श्रीरामपूर नगरीमध्ये सोमवार, दि. १५ जून रोजी भव्य आगमन झाल्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशनच्या व्यापारी मंगल कार्यालयात दुपारी १२ ते ३ धार्मिक कार्यक्रम व महाआरतीचा सोहळा होणार आहे. पालखी दुपारी ४ वा. वैजापूरकडे रवाना होणार




आहे. पालखी पादुका परिक्रमा स्वागतासाठी व त्यानंतर होणाऱ्या धार्मिक सोहळा, महाआरती व महाप्रसाद आदी कार्यक्रमात स्वामी भक्त व भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक श्री स्वामी समर्थ ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘मेरी बात’मधून विवेकशीलतेची चळवळ

**जनता आवाज वृतसेवा**

**श्रीरामपूर**- संत ज्ञानेश्वरानंतर साने गुरुजी म्हणजे दुसरी माऊली अशा साने गुरुजींच्या विचारधाराने स्थापन झालेल्या श्रीरामपूर आंतरभारती शाखेच्या ‘मेरी बात’ या व्याख्यानमालेतून एक विवेकशीलतेची चळवळ सुरू केली. त्यासाठी आंतरभारतीचे अध्यक्ष प्रा. सुभाष लिंगायत यांची कौतुक केले पाहिजे, असे प्रतिपादन मेरी बात व्याख्यानमालेचे २२ वे पुष्प गुंफताना प्रा. आदिनाथ जोशी यांनी केले आहे.

साने गुरूजी यांच्या ७६. व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित विशेष अभिवादन सभेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ शंकरराव गागरे होते. सर्वप्रथम आंतरभारती शाखेच्या खजिनदार शोभा लिंगायत यांनी आपल्या सुमधुर वाणीतून ‘‘खरा तो एकची धर्म’’ हे




गीत सादर केले. यानंतर या भागातील जनसेवक रितेश एडके, प्राचार्य शेळके प्रा आदिनाथ जोशी यांच्या हस्ते साने गुरुजी प्रतिमा पूजन करण्यात आले. यानंतर सचिव लेविन भोसले यांनी केले.

प्रमुख वक्ते आदिनाथ जोशी यांचा परिचय कार्यकारी सदस्य सुखदेव सुकळे यांनी करून दिला. आंतरभारतीचे कार्यकारी सदस्य दत्तात्रय रायपल्ली यांच्या हस्ते प्रा. आदिनाथ जोशी व तेजल धोंगडे या दोघांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. शंकरराव गागरे म्हणाले आपण साने गुरुजींचे विचार आत्मसात केले तर खऱ्या अर्थाने माणसातला माणूस निर्माण होईल साने गुरुजीच्या आईने ही शिकवण त्यांना दिली. श्यामची आई या पुस्तकातून त्यांनी सर्व जगाला प्रेमाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला म्हणून साने गुरुजींचे आंतरभारती सर्वश्रेष्ठ आहे.

# पत्नीचे अपहरण करून पतीवर जीवघेणा हल्ला

## प्रेमविवाह केल्याचा राग; पतीची पोलिसांत धाव

**जनता आवाज वृतसेवा**

**संगमनेर**-केल्याच्या प्रेमविवाह कारणावरून मंगळापूर येथील एका जोडप्यावर नातेवाईकांनी प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हल्लेखोरांनी पत्नीचे भररस्त्यात अपहरण करून तिला अज्ञातस्थळी नेले असून, पतीवर वारंवार जीवघेणा हल्ला करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

अमोल उर्फ विनोद बाळासाहेब भोकनळ (रा. मंगळापूर, ता. संगमनेर) याने मागील वर्षी १२ जुलै रोजी आळंदी येथे स्वामिनी (पूर्वाश्रमीची स्वामिनी भास्कर कुटे) हिच्याशी प्रेमविवाह केला होता. हा विवाह मुलीच्या कुटुंबियांना मान्य नसल्याने लग्नानंतर त्यांच्याकडून या जोडप्याचा पाठलाग सुरू होता. मागील महिनाभरापासून जीव वाचवण्यासाठी हे जोडपे परागंदा झाले होते. दरम्यान, ११ मे रोजी शिर्डीजवळील गोदावरी वसाहत परिसरात ओंकार सुभाष कुटे, राजाराम निवृत्ती पवार व त्यांच्या साथीदारांनी या जोडप्याला गाठले. यावेळी स्वामिनीने आपल्या पतीला वाचवण्यासाठी टाहो फोडला, मात्र हल्लेखोरांनी तिच्या विनवण्यांकडे दुर्लक्ष करत तिला बळजबरीने



माझी पत्नी आणि माझा संपर्क तोडण्यात आला आहे. तिलाही जबर मारहाण करण्यात आली असून आमच्या दोघांच्याही जीवाला धोका आहे. आम्ही दोघेही सज्ञान असून केवळ प्रेमविवाह केला म्हणून आम्हाला नाहक त्रास दिला जातोय. पोलिसांनी या प्रकरणाची त्वरित दखल घ्यावी. मी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन माझी व्यथा मांडणार आहे.

**- अमोल भोकनळ (पीडित पती)**

गाडीत डांबून अज्ञातस्थळी पळवून नेले. या घटनेनंतर अमोलने शिर्डी पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीचा राग धरून हल्लेखोरांनी पुन्हा एकदा अमोलवर जीवघेणा हल्ला केला. संगमनेरमध्ये आपल्या जीवाला असलेला धोका लक्षात घेता, अमोलने नाशिक जिल्ह्यातील घोटी पोलिसांकडे धाव घेत आपला जबाब नोंदवला आहे.

# माहेश्वरी महिला मंडळाकडून मांची हिल येथे वृक्षारोपण

**जनता आवाज वृतसेवा**

**आश्वी**-संगमनेर शहरातील श्री माहेश्वरी सिनिअर महिला मंडळाने पर्यावरण संवर्धनाचा स्तुत्य उपक्रम राबवला आहे. मंडळाच्या ५० ज्येष्ठ महिलांनी मांचीहिल (ता. संगमनेर) येथील उज्ज्वल गोरक्षण केंद्र परिसरात ५५ फळझाडांची लागवड करून ‘एक वृक्ष, शंभर उपकार’ हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. यावेळी या महिलांनी स्वतः ५० केशर आंबा आणि ५ नारळी अशा एकूण ५५ फळ झाडांची लागवड केली.

या वृक्षारोपणामुळे भविष्यात गौशाळा परिसराचे सौंदर्य वाढणार असून, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोठी मदत होणार आहे. यावेळी झाडे लावून ती जगवण्याचा संकल्प करत, सर्व महिलांनी परिसर हरित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

मंडळाच्या अध्यक्षा रमा मणियार, उपाध्यक्ष मीना मणियार, सचिव ज्योती राठी, सुवर्णा मालपाणी, चंद्रकला चांडक, गोमतीबाई मणियार, कांताबाई बुब यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल उज्वल गोरक्षण केंद्र गौशाळा परिवारातर्फे चेतना अश्विन मुथ्था यांनी उपस्थित सर्व महिलांचे स्वागत करून



# मराठी शाळा टिकल्या तर गावपण टिकतील

## पद्मश्री पोपटराव पवार : राळेगणसिद्धीत शिक्षण हक्क परिषद

**जनता आवाज वृतसेवा**

**पारनेर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संस्कार, जीवन जगण्याची कला मिळते. परंतु, नव्या शैक्षणिक धोरणानुसार अनेक प्राथमिक शाळांचे भवितव्य अंध:कारमय आहे. गावागावांतील मराठी शाळा टिकल्या तर गावाचे गावपण, संस्कार व संस्कृती टिकेल, असे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले. प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोर मांडण्याची ग्वाही त्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघातर्फे राळेगणसिद्धी येथे गुरुवारी (दि. ११) राज्यस्तरीय शिक्षण हक्क



परिषद व राज्यस्तरीय महामंडळ सभा पार पडली. शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात व राज्य संघाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्यासह राज्य संघाचे उपनेते रावसाहेब रोहोकले, बाळासाहेब झावरे, आबासाहेब जगताप, जिल्हाध्यक्ष प्रवीण ठुबे, राजेश हिवाळे, बाळकृष्ण तांबारे, मच्छिंद्रनाथ मोरे, किशन इदगे, सचिन डिंबळे, स्वाती शिंदे, डॉ. संजय कळमकर, संजय शेळके, रामराव निकम, रावसाहेब सुंबे, बळवंतपाटील, राजकुमार साळवे, जिल्हाध्यक्ष सुरेश निवडुंगे आदी उपस्थित होते.पवार म्हणाले की, दिवसेंदिवस परिस्थिती बिघडत चालली आहे. गावाच्या जडणघडणीत गुरूजींचा मोठा प्रभाव होता. आता तो कमी झाला आहे. केवळ आर्थिक पॅकेजसाठी शिक्षण व अभ्यासक्रम सुरू असल्याची खंत पवारांनी व्यक्त केली.

शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे म्हणाले, न्यायालयीन लढाई जुन्या-नव्या शिक्षकांना सोबत घेऊन १२ ते १३ लोकांची कायदेशीर टीम बनवणार आहोत. जुन्या पेन्शनबाबत प्रयत्न करावे. प्रश्न न सुटल्यास आक्रोशाने शिक्षण दिन साजरा करू.

# केदारेश्वर कारखान्यावर जप्तीची कारवाई

## ऊस उत्पादकांना एफआरपी रक्कम वेळेत दिली नाही

**जनता आवाज वृतसेवा**

**बोधेगाव** : शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील केदारेश्वर सहकारी साखर कारखान्यावर शासनाने आरआरसी (जप्ती) कारवाई केली. याबाबत कारखाना व्यवस्थापनाने अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे गुरुवारी (दि.११) खुलासा केला आहे. २०२५-२६ मधील हंगामात ऊस उत्पादकांना थकीत एफआरपी रक्कम वेळेत न दिल्याने शासनाने ही कारवाई केली आहे. कारखाना प्रशासन शेतकऱ्यांचे पैसे लवकरच देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगितले आहे.

केदारेश्वर कारखान्यात २०२५-२६ हंगामात गाळप झालेल्या उसाचे पेमेंट वेळेत अदा न केल्याने शासनाने कारखान्यावर जप्तीची कारवाई केली.

### शेतकऱ्यांचा प्रत्येक रुपया देणार : ढाकणे

केदारेश्वर कारखान्याकडील थकीत एफआरपीची उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना निश्चित अदा केली जाईल. शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. या विषयाचे राजकीय भांडवल करू नये, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे यांनी केले आहे.

तसे वृत्त माध्यमातून समोर आल्यानंतर शेतकरी आणि ऊस वाहतूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर कारखान्याने खुलासा केला आहे. ९ जानेवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान कारखान्याला ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांची रक्कम थकीत आहे. ही रक्कम लवकरच अदा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शेतकऱ्यांनी विचलित न होता सहकार्य करण्याचे आवाहन कारखाना प्रशासनाने केले आहे.राज्यातील साखर उद्योग आर्थिक आव्हानांचा सामना करीत आहे. ऊस उत्पादकांना वाढीव दर द्यावे लागत असताना साखरेच्या बाजारभावात अपेक्षित वाढ झालेली नाही. परिणामी, साखर कारखान्यांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. कारखान्याने आजवर कोणतीही देयके बुडवलेली नाहीत. केवळ देयके अदा करण्यास विलंब झाला.

# किसान सभेकडून राज्य सरकारचा निषेध

## देवस्थान जमीन कायदा मसुदा स्थगितीने शेतकऱ्यांवर अन्याय

**जनता आवाज वृतसेवा**

**अकोले** : देवस्थान जमीन संदर्भातील राज्य सरकारने प्रसिद्ध केलेला कायद्याचा मसुदा स्थगित केल्याबद्दल किसान सभेने राज्य सरकारचा निषेध केला आहे. हा कायदा बनविण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, अशी किसान सभेची मागणी आहे.

किसान सभेने काढलेल्या लाँग मार्चमध्ये देवस्थान जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना त्या जमिनीची मालकी देण्यासाठी कायदा करण्याचे मान्य करण्यात आले होते. राज्य सरकारने यासंदर्भात कायद्याचा मसुदा चर्चेसाठी नुकताच प्रकाशित केला होता. त्यावर हरकती मागण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र, अतिहिंदुत्ववादी संघटनांनी दबाव आणल्यामुळे कायद्याचा हा प्रस्ताव स्थगित करण्यात आला असून, त्यासंदर्भात शासनादेश काढण्यात आला आहे. ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून, वर्षानुवर्ष देवस्थान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांवर हा मोठा अन्याय असल्याची टीका किसान सभेचे डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

कर्जमाफीच्या अटी व देवस्थान जमीन प्रश्नी किसान सभेच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात




### आंदोलनाचे यांनी केले नेतृत्व

आंदोलनाचे नेतृत्व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव सदाशिव साबळे, शांताराम फापाळे, गुलाब महाले, सुखदेव महाले, दत्ता फापाळे, लिलाबाई फापाळे, सीताबाई फापाळे, शांताराम वारे, संतोष फापाळे, किसन फापाळे, सुभाष मवाळ आदींनी केले.

आले. कायदा बनवण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी व कायद्याच्या मसुद्यात शेतकरी हिताचे बदल करून हा कायदा मंजूर करावा, अशी मागणी असल्याचे डॉ. नवले यांनी सांगितले. किसान सभेच्या नेतृत्वाखाली बेलापूर येथे शेतकऱ्यांनी तलाठी कार्यालयासमोर निदर्शने करीत मोर्चा काढून राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या केलेल्या फसव्या कर्जमाफीचा निषेध करीत घोषणा दिल्या आणि आंदोलन केले. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, खतांचे भाव कमी करा, कर्जमाफीसाठी लावलेल्या जाचक अटी रद्द करा, सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या, आदी मागण्या करण्यात आल्या.

## संपादकीय

# ‘नीट’चा वीट येऊ नये, म्हणून...

यंदा ‘नीट’चे पेपर फुटल्याने परीक्षाच रद्द झाली. अहोरात्र कष्ट करून परीक्षेची तयारी करणाऱ्या देशातील तेवीस लाख विद्यार्थ्यांवर, त्यांच्या पालकांवर आणि शिक्षकांवर पेपरफुटीमुळे मोठा मानसिक आघात झाला. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांची काहीच चूक नसताना पुन्हा एकदा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. नीट परीक्षेशी संबंधित काही अध्यापक आणि व्यावसायीक कोचिंग क्लासेसचे चालक यांच्या संगनमतातून परीक्षेतील अपेक्षित प्रश्न बाहेर आले. आपल्या लेकरा-बाळांचे भले व्हावे म्हणून श्रीमंत पालकांनी लाखो रूपये मोजून ते खरेदी केले. ‘नीट’ पेपरफुटीची सीबीआय चौकशी करत आहे. पेपरफुटीशी संबंधित अध्यापक आणि नामवंत कोचिंग क्लासेसचे चालक मिळून किमान तेराजण तरी सीबीआयच्या ताब्यात आहेत. दर दोन-चार दिवसांनी पेपरफुटीत गुंतलेल्या पालकांची, शिक्षकांची नवनवीन नावे सीबीआयच्या रडावर येत आहेत. पैशाच्या लोभाने पेपरफुटीमध्ये गुंतलेले लातूर आणि पुण्यातील शिक्षणक्षेत्रातील कोचिंग सम्राट आणि अध्यापक ‘नीट’ या अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षेत गुंतले आहेत, हे अतिशय दुर्दैवी आहेच, पण त्यातून देशभर महाराष्ट्राची बदनामी झाली आहे. पेपरफुटीचे आज चर्चेत असलेल्या प्रकरणासारखेच एक प्रकरण २०२४ मध्येही सर्वोच्च न्यायालयात आले होते. तेव्हा एक समिती स्थापन केली गेली होती. या समितीने दिलेल्या शिफारसी एनटीएने स्वीकारल्या होत्या. तरीही यंदा पेपर फुटले. यंदा ३ मे रोजी देशातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ केंद्रांवर ‘नीट’ची परीक्षा आयोजित करण्यात आली होती. तिला तेवीस लाख विद्यार्थी बसले होते. ७ मे रोजी परीक्षेत काही गडबड झाल्याचे समजले. नंतर हे प्रकरण केंद्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आले. १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली. शिक्षण मंत्रालय आणि एनटीएने नीटची परीक्षा २१ जून रोजी पुन्हा होणार असल्याचे जाहीर केले. नीट म्हणजे नॅशनल एलिजिबिलिटी कम एंट्रन्स टेस्ट ही भारतीय वैद्यकीय आणि दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा आहे. अशा परीक्षेची सुरूवात २०१३ मध्ये सुरु झाली. या परीक्षेच्या गुणवत्तेवरून एमबीबीएस, बीडीएस, आयुष (बीएएमएस, बीएचएमएस), नर्सिंगच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळतो. देशात एमबीबीएसच्या एक लाखाहून अधिक आणि बीडीएसच्या २७ हजाराहून अधिक जागा उपलब्ध आहेत. पेपरफुटीच्या प्रकरणात आजवर तेराजणांना अटक झाली आहे. पेपरफुटीने तेवीस लाख विद्यार्थ्यांचे भविष्य आणि करिअर धोक्यात टाकले. नीट परीक्षेची अवघ्या देशात बेअब्रु झाली असताना केंद्रातील एकही मंत्री याविषयी ‘ब्र’ सुध्दा काढत नाहीत. गेल्या दहा-वर्षांमध्ये विविध राज्यांमध्ये विविध परीक्षांच्या पेपरफुटीच्या ९० घटना घडल्या आहेत. ४८ वेळा परीक्षा रद्द झाल्या आहेत. सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मध्ये पेपरफुटीला एक कोटी रुपये दंड आणि दहा वर्षे तुरूंगवास अशी शिक्षा असतानाही २०२६ मध्ये पेपर कसे फुटले? कठोर कायदा असुनही अशा शिक्षेची भीती कोणालाच वाटत नाही का? पेपर फोडणारे, पेपर विकणारे आणि पेपर विकत घेणारे सर्व सारखेच दोषी आहेत. आपल्या मुलाबाळांना डॉक्टर करण्यासाठी वाटेल ती किमत मोजण्याची तयारी असलेले अनेक धनवान पालक आहेत. एनटीए यंत्रणेतील काही घटक सामील असल्याशिवाय आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उच्चपदस्थांचे संरक्षण असल्याशिवाय पेपर बाहेर येणे कसे शक्य आहे? परीक्षा निकोप आणि पारदर्शक नसेल तर निकाल तरी विश्वासार्ह कसे असतील? म्हणून नीट परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेपुढेच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पेपर विकत घेऊन डॉक्टर बनणारे दवाखान्यात किंवा रुग्णालयात रूग्णाला कशी सेवा देतील? केवळ पैसे कमावण्यासाठी आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी ते डॉक्टर म्हणून वावरत राहतील आणि रूग्णांच्या जीवाशी खेळ खेळतील. एनटीएचे कार्यालय असलेल्या शोधात पेपर सेट केला जातो, तिथे पेनसुध्दा बरोबर घेऊन जाता येत नाही. तिथे कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास मनाई आहे. मग तेथून पेपर बाहेर कसा येऊ शकतो? फुटलेला पेपर हा मूळ पेपरची फोटोकॉपी आहे काय? बरोबर कॅमेरा घेऊन जाता येत नाही, मग फोटो किंवा फोटो कॉपी काढणे तरी कसे शक्य आहे? म्हणूनच नीट यंत्रणेतील काहीजणांचा सहभाग असल्याशिवाय पेपर फुटू शकत नाही.

पेपर सेट करणाऱ्या जीवशास्त्र विषयाच्या लेक्चरर मनीषा गुरूनाथ मांढरे, पेपर सेटर प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी, विद्यार्थी आणि कोचिंग क्लासशी संपर्क ठेवणारी ब्युटिशियन मनीषा वाघमारे, पेपरचा नेटवर्कमध्ये सौदा करण्यात सहभाग असलेला धनंजय लोखंडे, प्रश्नांची पीडीएफ बनवणारा विद्यार्थी शुभम खैरनार, पीडीएफवरून हार्ड कॉपी बनवणारा हरियाणाचा यश यादव, नीट पेपरचा व्यवहार करणारा मांगीलाल बिंवाल, मांगीलालचा भाऊ दिनेश बिंवाल (राजस्थान), फुटलेले पेपर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणारा कोचिंग क्लासचा संचालक शिवराज माटेगावकर हे सारे सीबीआयच्या जाळ्यात सापडले आहेत. पेपरफुटीची साखळी आणि कटाचा शोध घेण्यासाठी सीबीआयने किमान ५० ठिकाणी शोध मोहीम घेतली. त्यात दस्तऐवज, लॅपटॉप, मोबाईल जप्त केले गेले. पाच राज्यांमध्ये नीट पेपरची विक्री झाली आणि सर्वाधिक विक्री महाराष्ट्रात झाली, असे तपासात आढळून आले आहे. एनटीएचे अध्यक्ष प्रदीपकुमार जोशी यांचे नाव चर्चेत येत असते, पण या प्रकरणाशी आपला काही संबंध नाही असे एनटीएने जाहीर करून टाकले. २०२४ मध्ये पेपर फुटले तेव्हा जोशी हेच एनटीएचे अध्यक्ष होते. ते पूर्वी मध्य प्रदेश लोकसेवा आयोगाचे चेअरमन असतानाही वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. गेल्या दहा वर्षांमध्ये नीटचे पेपर चार वेळा फुटले. २०१७ मध्ये पटणा आणि जयपूर येथे, २०२१ मध्ये जयपूर तसेच उत्तर प्रदेश येथे, २०२४ मध्ये झारखंड आणि बिहारमध्ये आणि २०२६ मध्ये सीकर, जयपूर आणि महाराष्ट्रात पेपरफुटीच्या घटना घडल्या. वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या मटक्याचा आकडा वेळेपूर्वी कधीच फुटत नाही मग अनेक स्तरावर कडक सुरक्षा आणि दक्षता असुनही नीटचा पेपर कसा फुटतो, असा सवाल करणाऱ्या पोस्टने सोशल मिडियावर धमाल उडवली, मात्र या विषयाचे गांभिर्य सर्वोच्च मानले जायला हवे, हे ही खरेच.

# स्थानिकांना नोकरी, कर्जबुडव्यांची मालमत्ता जप्ती

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात इंधन दरवाढीपलिकडेही काही लक्षवेधी बातम्या चर्चेत राहिल्या. पहिली बातमी म्हणजे जिल्हा बँकांमधील नोकरभरतीत यापुढील काळात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दुसरी बातमी म्हणजे कर्ज न फेडल्यास यापुढे मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकणार आहे. दरम्यान, अमेरिकेत हापूस आणि केशर आंबा काही मिनिटांमध्येच कसा संपतो याची रंजक माहिती समोर आली आहे.

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात इंधन दरवाढीपलिकडेही काही लक्षवेधी बातम्या चर्चेत राहिल्या. पहिली बातमी म्हणजे जिल्हा बँकांमधील नोकरभरतीत यापुढील काळात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दुसरी बातमी म्हणजे कर्ज न फेडल्यास यापुढे मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकणार आहे. दरम्यान, अमेरिकेत हापूस आणि केशर आंबा काही मिनिटांमध्येच कसा संपतो याची रंजक माहिती समोर आली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकर भरतीत भूमिपुत्रांसाठी आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील मूळ रहिवाशांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सहकार विभागाकडून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. बँकांचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील तरुणांना पदभरतीत प्राधान्य मिळणार आहे. केवळ ३० टक्के जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी देता येणार आहेत. पदभरतीची जाहिरात काढलेल्या बँकांनाही आदेश लागू असणार आहे. राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आदेश लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्याच जिल्ह्यात नोकरीची संधी मिळणार आहे. राज्य सरकारने स्थानिक भूमिपूत्रांना रोजगार देण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे.राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. त्या प्रामुख्याने शेतकरी आणि ग्रामीण विकास संस्थांशी जोडलेल्या आहेत. या जिल्हा सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र आणि सभासद त्या त्या विशिष्ट जिल्ह्यापुरतेच मर्यादित असतात. या बँकांना स्थानिक बोलीभाषा, भौगोलिक परिस्थिती आणि ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असलेले कर्मचारी मिळाल्यास या बँकांच्या ग्राहकांना आणि सभासदांना दर्जेदार सेवा देता येईल. या उद्देशाने सरकारने हा बदल केला आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकांची ओळख विकास संस्थांच्या मातृसंस्था अशी असते. गावातील विकास संस्थांचे अस्तित्व या बँकांवर अवलंबून असते. स्थानिक तरुणांची भरती झाल्याने बँकांचा कारभार अधिक लोकाभिमुख होईल आणि शेतकऱ्यांना कर्जपुरवठा तसेच इतर सुविधा मिळताना येणाऱ्या विविध अडचणी दूर होतील, असा विश्वास सहकार विभागाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, रिझर्व्ह बँकेने नवीन मसुदा मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एखादी व्यक्ती कर्जाची परतफेड करण्यास अयशस्वी ठरल्यास बँक वसुलीसाठी त्यांची मालमत्ता जप्त करू शकते. या नवीन मसुदा नियमांनुसार, बँका आणि बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी) कर्जवसुली प्रक्रियेत केवळ एक अपवादात्मक उपाय म्हणून स्थावर मालमत्ता ताब्यात घेऊ शकतील. केंद्रीय बँकेने स्पष्ट केले आहे, की नियमित कर्ज देण्याच्या व्यवहारांच्या बदल्यात सामान्य परिस्थितीत नियामक संस्थांनी बिगरवित्तीय मालमत्ता




ताब्यात घेणे अपेक्षित नाही. हा नियम बुडीत कर्जांशी (एनपीए) संबंधित मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचे नियम स्पष्ट करतो. रिझर्व्ह बँकेच्या मते जास्तीत जास्त वसुलीसाठी अशा मालमत्ता विहित वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने विकणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. आधीच एनपीए (बुडीत कर्ज) म्हणून घोषित केल्या गेलेल्या कर्जांनाच हा नियम लागू होतो.

बँकांनी प्रथम वसुलीच्या इतर सर्व पद्धती वापरून पाहिल्या पाहिजेत. त्यांना पैसे वसूल करण्यात अपयश आले तरच ही तरतूद लागू होईल. कर्जाच्या वसुलीच्या बदल्यात बँक किंवा वित्तीय संस्था कर्जदाराकडून निर्दिष्ट गैरवित्तीय मालमत्ता, म्हणजेच स्थावर मालमत्ता (जमीन, घर, इमारत इत्यादी) ताब्यात घेईल. यामध्ये गैर-बँकिंग मालमत्तांचा (एनबीए) समावेश आहे. मसुद्यानुसार, बँका अशी मालमत्ता जास्तीत जास्त सात वर्षांसाठीच ठेवू शकतात. त्यानंतर त्यांना ती विकावी लागते. तसेच, बँका ही मालमत्ता पुन्हा त्याच कर्जदाराला किंवा त्याच्याशी संबंधित लोकांना विकू शकत नाहीत. यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होईल. आता बँकांना त्यांच्या ताळेबंदात अशा मालमत्तांची संपूर्ण माहिती द्यावी लागणार आहे. यामुळे गुंतवणूकदार आणि इतरांना बँकेची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल. रिझर्व्ह बँकेने २६ मे पर्यंत या नियमांवर सामान्य जनता आणि भागधारकांकडून सूचना मागवल्या आहेत. यानंतर अंतिम नियम निश्चित केले जातील.

आता एक लक्षवेधी बातमी. भारतीय आंब्यांची लोकप्रियता इतकी वाढली आहे, की अमेरिकेतील अनेक दुकानांमध्ये आंबे विक्रीसाठी येताच काही मिनिटांमध्ये संपून जात आहेत. भारतीय चवीचा आणि सुगंधाचा हा गोड ठेवा आता जागतिक बाजारपेठेतही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. अमेरिकेतील एका स्टोअरमधील अनुभव सांगताना एकाने नमूद केले, की सायंकाळी ४:५६ वाजता आंब्यांचा स्टॉक दुकानात आला आणि अवघ्या वीस मिनिटांमध्ये, म्हणजे ५:१६ वाजेपर्यंत तो पूर्णपणे संपला. ही पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. न्यूयॉर्कमध्ये राहणाऱ्या एका भारतीय महिलेने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओमधून हा अनुभव अधोरेखित केला. तिने सांगितले की, न्यूयॉर्क शहरात तिने तीन आंबे पाच डॉलर्सना विकत घेतले आणि आंबे खाताना भारतातील भावंडांसोबतचे उन्हाळ्याचे दिवस आठवत असल्याची भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली. यातून आंबा हे केवळ फळ नसून भारतीयांच्या भावविश्वाशी जोडलेली सांस्कृतिक आठवण असल्याचे स्पष्ट होते. अमेरिकन बाजारपेठेत विशेषतः हापूस आणि केशर आंब्यांच्या जातींची मोठी मागणी दिसून येते. महाराष्ट्रातील कोकण पट्ट्यात पिकणारा हापूस आंबा अप्रतिम गोडवा, वैशिष्टयपूर्ण सुगंध आणि मऊ गरासाठी जगभर प्रसिद्ध आहे, तर गुजरातमधील केशर आंबा रसाळपणा आणि गडद केशरी रंगासाठी ओळखला जातो. अमेरिकेत राहणारे भारतीय नागरिक या आंब्यांसाठी दुकानांबाहेर रांगा लावत आहेत. अनेकांनी हंगाम सुरू होण्यापूर्वीच या आंब्यांची आगाऊ नोंदणी केली.

याच सुमारास आलेली आणखी एक दखलपात्र बातमी म्हणजे इराणला शस्त्रे आणि लष्करी साहित्य पुरवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांविरोधात अमेरिकेने मोठी कारवाई करत दहा कंपन्या आणि व्यक्तींवर निर्बंध जाहीर केले आहेत. या कारवाईमध्ये चीन, हाँगकाँग, दुबई, बेलारूस आणि इराणमधील काही कंपन्यांचा समावेश आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने या कंपन्यांवर इराणच्या संरक्षण क्षेत्राला मदत केल्याचा आरोप केला आहे. अमेरिकेच्या म्हणण्यानुसार या कंपन्यांनी इराणच्या लष्कराला शस्त्रे, उपकरणे आणि कच्चा माल उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः इराणच्या ‘शाहिद ड्रोन कार्यक्रमा’साठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीत त्यांनी मदत केल्याचा आरोप आहे. ‘शाहिद ड्रोन’ इराणच्या संरक्षण धोरणातील महत्त्वाचे साधन मानले जाते आणि पश्चिम आशियातील संघर्षांमध्ये त्यांचा वापर झाल्याचे अनेकदा समोर आले आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने स्पष्ट केले, की, इराणच्या लष्करी-औद्योगिक जाळ्यावर आणखी आर्थिक दबाव आणण्यासाठी भविष्यातही कठोर पावले उचलली जातील. इराणला आपली उत्पादनक्षमता वाढवण्यापासून रोखणे आणि आपल्या सीमेबाहेरील प्रभाव विस्तारण्यास अडथळा निर्माण करणे हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. याशिवाय, इराणच्या कथित अवैध व्यापाराला मदत करणाऱ्या परदेशी कंपन्या आणि वित्तीय संस्थांनाही भविष्यात आणखी निर्बंधांना सामोरे जावे लागू शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेंट यांनी सांगितले, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका इराणच्या लष्कराला मदत करणाऱ्या विदेशी कंपन्यांवर लक्ष केंद्रित करत राहील. अमेरिकन सैन्याविरोधात वापरली जाणारी शस्त्रे आणि तंत्रज्ञानाचा पुरवठा थांबवणे हे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे ही कारवाई ट्रम्प यांच्या प्रस्तावित चीन दौऱ्याच्या काही दिवस आधी करण्यात आली आहे. या दौऱ्यात ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चीनशी संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्यामागे केवळ सुरक्षाविषयकच नव्हे, तर व्यापक भू-राजकीय संदेशही दडलेला असल्याचे मानले जात आहे. अमेरिकेने उचललेले हे पाऊल केवळ आर्थिक निर्बंधांचे नसून जागतिक सामरिक संघर्षाच्या व्यापक समीकरणांचा भाग मानले जात आहे. इराणच्या वाढत्या लष्करी प्रभावाला मर्यादा घालण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आणि त्यातून निर्माण होणारे आंतरराष्ट्रीय राजकीय परिणाम याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## गुटखा रॅकेटवर थेट मकोका

पात्रता तपासणे आवश्यक राहील. पात्रता सिद्ध झाल्यास संबंधित प्रकरणात अन्न सुरक्षा व मानके अधिनियमातील लागू तरतुदींसह मकोका अंतर्गतही कारवाई करण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधला जाईल. मात्र, मकोका लागू करण्यासाठी अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत आवश्यक असलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली जावी, असे तुकाराम मुंढे यांनी निर्देश दिले आहेत.

सदर निर्देशांमध्ये केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी संपूर्ण नेटवर्कवर कारवाई करण्यावर भर देण्यात आला आहे. उत्पादक, वित्तपुरवठादार, प्रमुख पुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यांची साखळी पुराव्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात येणार आहे. संघटित स्वरूपाचे प्रकरण असल्यास उपलब्ध पुराव्यांच्या आधारे नेटवर्कमधील सर्व ओळख पटलेल्या अशा संघटीत कार्यरत सदस्यांविरुद्ध कारवाई करण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात येईल. यामुळे प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध व्यापारातील मुख्य सूत्रधार व आर्थिक लाभार्थी यांना कायद्याच्या चौकटीत आणणे शक्य होईल. प्रत्येक जिल्ह्यात मकोका पात्रता, एफआयआर, आरोपपत्रे, न्यायालयीन आदेश, जप्ती, तपासाची स्थिती आणि अंतिम निकाल यांची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र अभियोजन नोंदवही ठेवण्यात येईल. राज्यस्तरावर मुख्यालयात एकत्रित नोंदवही ठेवण्यात येणार असून त्याद्वारे अशा प्रकरणांवर नियमित देखरेख ठेवली जाईल. सह आयुक्त स्तरावर जिल्हानिहाय अहवालांचा आढावा घेऊन प्रादेशिक अहवाल दरमहा आयुक्तांना सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## मर्यादेपलीकडचे कर्ज भरावेच लागेल?

महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. कर्जमाफीवर विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना त्यांनी कर्जमाफीतील अटीमागील कारणे सांगितली आणि ४० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना या निर्णयाचा फायदा होणार असल्याचेही स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीत कोणत्याही कठोर अटी किंवा शर्ती घातलेल्या नाहीत. मात्र, महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बँका आणि ग्रामीण बँकिंग व्यवस्था टिकून राहावी यासाठी एक विशेष अट ठेवण्यात आली आहे. राज्यातील ४० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. कर्जमाफीची अंमलबजावणी सुरळीत व्हावी आणि उद्भवणाऱ्या अडचणी तातडीने सोडवता याव्यात यासाठी विशेष मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीत मुख्यमंत्री स्वतः दोन्ही उपमुख्यमंत्री आणि काही वरिष्ठ मंत्र्यांचा समावेश आहे. कर्जमाफीची प्रक्रिया पुढे सरकत असताना उद्भवणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना करण्याची जबाबदारी या समितीकडे असेल.

## ‘राजहंस’चा सौर ऊर्जा प्रकल्प कौतुकास्पद

लक्ष्मणराव कुटे, आर. बी. राहणे, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन राजेंद्र चकोर, ॲड. नानासाहेब शिंदे, दूध संघाचे संचालक विलासराव वर्पे, संतोष मांडेकर, विलास कवडे, बबनराव कुऱ्हाडे, बादशहा वाळुंज, संजय पोकळे, विक्रम थोरात, विष्णू ढोले, रवींद्र रोहम, प्रतिभाताई सोमनाथ जोंधळे, मंदाताई गोरख नवले, अविनाश सोनवणे, हौशीराम सोनवणे, सुभाष सांगळे, विनीत शहा, डॉ. सुजित खिलारी, सौर ऊर्जा प्रकल्पाचे हर्षल सातव, सिद्धार्थ थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. मा. मंत्री थोरात म्हणाले की, राजहंस दूध संघाने गुणवत्ता व शुद्धतेतून राज्यभर लौकिक निर्माण केला आहे. यामध्ये दूध उत्पादकांनी अधिक स्वच्छता व शुद्धता वाढविण्याबरोबर परदेशी उत्पादकांबरोबर आपली स्पर्धा करावी. दूध हे अन्न असून लहान मुलांच्या मुखात जाणारे असते. त्यामुळे प्रत्येकाने अधिक काळजी घेतली पाहिजे. टाटा कंपनी उत्पादित उभ्या राहिलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून दररोज १३५० किलो वॅट वीज निर्मिती होणार आहे. पुढील तीन वर्षात प्रकल्पावरील खर्चाची परतफेड झाल्यानंतर संघाला दीर्घकाळासाठी ही वीज उपलब्ध होणार आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक बचतीचा हा उपक्रम सहकार क्षेत्रासाठी दिशादर्शक ठरणारा असल्याचे ते म्हणाले. याचबरोबर दूध संघाच्या वाटचालीमध्ये उत्पादकांबरोबर अनेक अधिकारी कर्मचारी यांचे मोठे योगदान राहिले असून सेवानिवृत्ती हा एक जीवनाचा टप्पा आहे. यापुढील काळात नवे क्षेत्र खुले होत असून प्रत्येकाने आनंदाने राहिले पाहिजे. अमृत उद्योग समूहातील सर्व संस्था अत्यंत चांगल्या सुरू असून या संस्थांमुळे अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले. तर चेअरमन रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीवर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाची वाटचाल सुरू आहे. सुमारे अडीच एकर परिसरामध्ये उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून दररोज १३५० किलोवॅट वीज निर्मिती होणार आहे. यातून दररोज ५२२० युनिट वीज निर्मिती होणार असून महिन्याला दीड लाख युनिट वीज तयार होईल. पुढील तीन वर्षांमध्ये प्रकल्पाचा पूर्ण खर्च पूर्ण होऊन १०० टक्के मोफत वीज दूध संघाला मिळणार आहे. त्यातून मोठी बचत होणार आहे. सर्व मंजूर्यांसह तीन महिन्यात हा प्रकल्प पूर्ण झाला असल्याचे सांगताना आगामी काळात दूध शुद्धतेवर अधिक भर द्यावा लागणार असून गाव पातळीवर सोसायटी यांनी गाय गोठा ते संघ प्रक्रिया पर्यंत दुधाची काळजी घ्यावी. दूध संघाने ४ लाख लिटरपर्यंतचा टप्पा पार केला असून आगामी काळात दूध संकलन वाढवण्यासाठी काम करावे याचबरोबर दूध संघाच्या वाटचालीमध्ये अधिकारी कर्मचारी यांचा मोठा वाटा असून हे सांघिक यश असल्याचे ते म्हणाले. यावेळी दूध कन्सल्टंट विनीत शहा यांनी गाय गोठा, सोसायटी यामधील स्वच्छता व विविध उपायोजनांबाबतची माहिती शेतकऱ्यांना दिली. यावेळी रावसाहेब दुबे, विजय राहणे, बाबासाहेब गायकर, विलास शिंदे, रोशन गोपने, समीर शिंदे, विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक डॉ सुजित खिलारी यांनी केले. तर व्हा. चेअरमन राजेंद्र चकोर यांनी आभार मानले. यावेळी दूध उत्पादक व दूध सेवा सोसायटी यांचे चेअरमन सेक्रेटरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दूध संघात दीर्घकाळ सेवा देणारे जनरल मॅनेजर जी. एस. शिंदे, बाळासाहेब बडे, बाबासाहेब थोरात, साहेबराव खेमनर, गंगाधर बो-हाडे, रमेश कोळगे, विनायक वैद्य, वसंत थोरात, भाऊसाहेब आहेर, भानुदास घाडगे, भाऊसाहेब कानवडे, बाळासाहेब गडाख, दौलत बटवाल, शरद गुंजाळ, भाऊपाटील कोटकर, सोमनाथ लहारे या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करा

महाराज चौकात बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. आंदोलन सुरू होण्यापूर्वीच पंढरपूर पोलिसांनी वाहतूक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेचे कारण देत त्यांना नोटीस बजावली होती. तसेच प्रशासनाने आंदोलनासाठी पर्यायी जागा सुचवली होती.

मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी निवडलेले आंदोलनस्थळ बदलणार नाही, अशी भूमिका घेत रोहित पवार आंदोलनावर ठाम राहिले. त्यामुळे आंदोलनस्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करून विनाअट सरसकट कर्जमाफीची मागणी करत त्यांनी आपल्या आंदोलनाला सुरुवात केली आहे.

आ. रोहित पवारांनी ट्विट करत म्हटले की, विठुरायाची पंढरी सर्व भक्तांसाठी कायम खुली असतानाही सरकार बॅरिकेड्स लावून आमच्या मार्गात अडथळे आणत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने प्रत्येकाला आंदोलनाचा अधिकार दिला. त्यामुळे अन्नदात्यासाठीच्या या अन्नत्याग आंदोलनात कितीही अडथळे आणले तरी हे आंदोलन थांबणार नाही. सत्तेचा अहंकार जनतेच्या ताकदीसमोर कधीही टिकत नसतो. लढणाऱ्यांचे हात धरून आणि बोलणाऱ्यांचे तोंड दाबून सरकार स्वतःचाच पराभव सिद्ध करतंय. सरकारच्या दबावामुळे जिल्हा आणि स्थानिक प्रशासनाकडून अडथळे आणले जात असले, तरी मनाने मात्र प्रशासनातील सर्वजण आमच्यासोबत आहेत, हे सरकारने विसरू नये. राज्य सरकारने नुकतीच शेतकऱ्यांसाठी ३५ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली. परंतु त्यासोबत जोडलेल्या अनेक अटी व शर्तींमुळे राज्यातील शेतकरी संघटनांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. कालच (११ जून) मंचर येथे विविध शेतकरी संघटनांनी एकत्र येत सरकारच्या या कर्जमाफीच्या जीआरची होळी केली होती.

अन्नत्याग आंदोलनापूर्वी पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच तमाम वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या पवित्र नामदेव पायरीवर माथा टेकून आशीर्वाद घेतला. अन्नदात्याच्या न्यायासाठीचा हा लढा आता अधिक ताकदीने सुरू राहील. शेतकऱ्यांचा आवाज आणि हे अन्नत्याग आंदोलन जनतेपर्यंत पोहोचू नये, यासाठी सरकार आंदोलनस्थळाच्या आजूबाजूला पडदे लावून ते लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे. खरं सांगायचं तर पडदा लावायला इथं काही तमाशा सुरू नाही; उलट सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आज राज्यातील सामान्य माणूस आणि बळीराजाच्या संसाराचाच तमाशा झाला आहे,‘‘असा सणसणीत टोला त्यांनी लगावला. सरकारला शेतकऱ्यांच्या वेदनेशी काहीही घेणंदेणं उरलेलं नाही हे राज्याचं मोठं दुर्दैव असल्याचं म्हणत, तुम्ही कितीही पडदे लावा किंवा अडथळे आणा, हा लढा आता थांबणार नाही, असा निर्धार रोहित पवारांनी व्यक्त केला.

## शक्ती, बुद्धी, सामर्थ्य यांचा सदुपयोग म्हणजे परमार्थ

अधिकमासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची काल (दि. १२) भक्तिमय वातावरणात सांगता झाली. समस्त ग्रामस्थ व श्री भगवतीमाता देवालय ट्रस्ट यांच्या सहकार्याने आयोजित या धार्मिक उपक्रमाचा समारोप ह.भ.प. महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला. भगवती माता मंदिरासमोरील भव्य प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी उपस्थिती दर्शविली. दि. ५ ते १२ जून या कालावधीत श्री भगवती माता मंदिराच्या सभामंडपात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. विजय महाराज कुहिले व ह.भ.प. नामदेव महाराज क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पारायण सोहळा पार पडला. आठ दिवस चाललेल्या या धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला.

काल्याच्या कीर्तनातून मार्गदर्शन करताना ह.भ.प. महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी रावणाने आपल्या शक्तीचा अहंकारातून व दुरुपयोगासाठी वापर केला, त्यामुळे त्याचा नाश झाला. उलट हनुमानाने आपल्या शक्तीचा उपयोग समाजहितासाठी व प्रभूसेवेसाठी केला, म्हणून आजही तो सर्वांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच अधिक मासात करण्यात आलेल्या या सेवेमुळे परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना त्यांनी निसर्गदेवतेकडे केली. अधिक मासाचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी उपासना, दानधर्म आणि सत्कर्म यांना जीवनात विशेष स्थान असल्याचे सांगितले. तसेच कुटुंबातील वडीलधाऱ्यांची सेवा करणे, त्यांच्या अनुभवाचा सन्मान राखणे आणि समाजहितासाठी कार्य करणे हीच खरी देशसेवा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. तारुण्यात केलेले चांगले संस्कार आणि सत्कर्म आयुष्याला योग्य दिशा देतात, असेही ते म्हणाले. उन्हाचा तडाखा असूनही या कार्यक्रमासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी पारायणार्थी, अन्नदान करणारे अन्नदाते तसेच कोल्हार भगवतीपूर व्यापारी असोसिएशन यांचे आभार व्यक्त केले. पुढील अधिक मासात अधिक भव्य स्वरूपात कथा महोत्सवाचे आयोजन करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते भगवतीपूर ग्रामस्थांनी तयार केलेल्या वैकुंठरथाचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले आणि भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता झाली.

## कारखाना कर्मचाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती मिळाली. मयत बाळासाहेब तारडे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन विवाहित मुली आणि जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे कारखाना परिसरासह राहुरी तालुक्यात शोककळा पसरली आहे.

# शनैश्वर देवस्थानला मिळणार नवे विश्वस्त मंडळ?

## राज्य सरकारच्या वरिष्ठ पातळीवर प्रक्रिया अंतिम टप्प्यात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळाची नियुक्ती लवकरच होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात राज्य सरकारच्या वरिष्ठ पातळीवर प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांकडून प्राप्त झाली आहे. विश्वस्त मंडळावर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, अभियंते, चार्टर्ड अकाउंटंट, तसेच प्रशासनाचा अनुभव असलेल्या लोकांना मंडळात संधी देण्याचा सरकारचा विचार असल्याचे समजते. संभाव्य विश्वस्तांची यादी अंतिम टप्प्यात असून, लवकरच त्याची अधिकृत घोषणा होऊ शकते. त्यामुळे राज्यातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांपैकी एक असलेल्या शनैश्वर देवस्थानला लवकरच नवे पदाधिकारीमिळण्याची अपेक्षा आहे.


राज्य सरकारने २४ सप्टेंबर २०२५ रोजी शनैश्वर देवस्थानचे तत्कालीन विश्वस्त मंडळ बरखास्त केले होते. नंतर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. १८ डिसेंबर रोजी सर्वोच्च २०२५ न्यायालयाच्या आदेशानुसार नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे प्रशासक पदाची जबाबदारी आली. सध्या त्यांच्याच माध्यमातून देवस्थानचा दैनंदिन कारभार, मालमत्तेची देखरेख व नियमित व्यवस्थापन सुरु आहे. मात्र, मोठे विकास प्रकल्प, भाविकांना सुविधा, दीर्घकालीन नियोजन व धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पूर्ण वेळ विश्वस्त मंडळ आवश्यक आहे.

सध्या देवस्थानचे प्रसादालय बंद आहे. त्यामुळे शनी भाविकांना भोजन मिळत नाही. तसेच, देवस्थानचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यरत नाही. त्यामुळे परिसरातील रुग्णांना उपचारासाठी इतरत्र जावे लागत असल्याची तक्रार आहे. देवस्थानातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे निर्णयक्षम व स्थानिक प्रश्नांची जाण असलेले विश्वस्त मंडळ नेमण्याची मागणी होत आहे. विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीची चर्चा सुरू असतानाच अध्यक्षपदी कोण बसणार, असा सवाल उपस्थित होत आहे. आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तीची निवडच अध्यक्षपदी होऊ शकते. दरम्यान, विश्वस्त पदासाठी इच्छुक असलेल्या लोकांनी मुंबईतील संपर्क वाढविल्याचे बोलले जात आहे.

### नव्या विश्वस्तांसमोरील आव्हानांचा डोंगर

नवीन विश्वस्त मंडळासमोर अनेक आव्हाने असतील. त्यात प्रसादालय सुरू करणे, रुग्णालय कार्यान्वित करणे, भाविकांच्या सुविधांचा विस्तार, व्यवस्थापन, पारदर्शक आर्थिक कारभार आणि धार्मिक पर्यटन विकास, तसेच शनिरत्न पुरस्कार सोहळा यांसारखे उपक्रम पुन्हा सुरू करावे लागणार आहेत. त्यामुळे नव्याने येणाऱ्या विश्वस्त मंडळासमोर अनेक आव्हानांचा डोंगर उभा असणार आहे. ते त्याला कसे सामोरे जातात हे पाहवे लागेल.

# ‘बालमाता समस्येबाबत कृती कार्यक्रम राबवा’



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील वाढत्या बालमाता प्रमाणाला आळा घालण्यासाठी काही ठोस कृती कार्यक्रम महत्त्वाचे आहेत; त्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून प्रयत्न व्हावेत. या अनुषंगाने राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या व वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांची भेट घेऊन अनेक मुद्यांवर चर्चा केली. अकोले तालुक्यात ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर २०२५ या दरम्यान ५५ बालमाता तालुक्यातल्या विविध गावांमध्ये आढळल्या आहेत. हा आकडा धक्कादायक असून तो वास्तविक अधिक जास्त असण्याची शक्यता देखील आहे.

राज्य महिला आयोगाची माजी सदस्य म्हणून आयोगाचे काम व त्याची व्याप्ती लक्षात घेत आपण तत्काळ या प्रश्नावर एक अभ्यास गट किंवा विशेष समिती स्थापन करून बालमातांच्या वाढत्या प्रश्नाचा अभ्यास व त्यावर नियोजनबद्ध कार्यक्रम देण्याची नितांत गरज असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. शासकीय, शैक्षणिक, सामाजिक व सर्व स्तरातील लोकांना आपण यात सहभागी करावे, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता आपण त्वरित कार्यवाही कराल अशी अपेक्षाही रुपवते यांनी पत्राद्वारे सचिव आवडे यांच्याकडे व्यक्त केली आहे.

या प्रश्नाशी निगडित सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे काम करण्याचा प्रयत्न होणार आहे. आपल्या भावी पिढीला बालविवाह व बालमाता यांसारख्या कुप्रथांपासून संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे, असेही उत्कर्षा रुपवते यांनी म्हटले आहे.

# श्रीरामपूरात गुंगीकारक औषधांचा साठा जप्त

## युवक ताब्यात; मेफेंटरमीनच्या १० बाटल्या जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने गोंधवणी रोड परिसरात कारवाई करत गुंगीकारक औषधांचा साठा जप्त केला. या प्रकरणी विक्रीच्या उद्देशाने मेफेंटरमीन सल्फेट इंजेक्शनच्या बाटल्या बाळगणाऱ्या एका युवकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक सालो यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गोंधवणी रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ राहणारा इमदाद गरीबबेग मिर्झा (वय २१) हा गुंगीकारक औषधांच्या बाटल्या विक्रीसाठी बाळगत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला.

कारवाईदरम्यान संशयिताकडील बॅगेची झडती घेतली असता ‘मेफेंटरमीन सल्फेट इंजेक्शन आयपी’च्या सात आणि ‘टर्मिवा’ ब्रँडच्या तीन अशा एकूण १० बाटल्या आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या औषधांची किंमत सुमारे ३ हजार ६० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



या औषधांबाबत औषध निरीक्षकांशी संपर्क साधला असता हे ‘एच’ श्रेणीतील औषध असून डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय त्याची विक्री करता येत नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच या औषधांचा गैरवापर झाल्यास आरोग्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असेही नमूद करण्यात आले.

याप्रकरणी इमदाद गरीबबेग मिर्झा याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत. गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# वाघोलीतून सहावे सोनोग्राफी मशीन जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर**: अवैध गर्भलिंग निदान चाचण्या आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात अहिल्यानगर पोलिसांना आणखी एक महत्त्वाचे यश मिळाले आहे. पुण्यातील वाघोली येथून गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले असून या रॅकेटची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या डॉ. अतुल अंकुश जाधव याने मेडिकल साहित्य पुरवठादार नरेंद्र ठाकरे याच्याकडून हे मशीन बेकायदेशीरपणे खरेदी केल्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत मशीन जप्त केले. या मशीनच्या साहाय्याने वाघोली परिसरात अवैध गर्भलिंग निदान चाचण्या सुरू असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.या गुन्ह्यात आतापर्यंत २१ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यात सात डॉक्टर, तीन मेडिकल चालक आणि एका मोठ्या वैद्यकीय साहित्य पुरवठादाराचा समावेश आहे.

# राजेंद्र गडगे प्रकरणाचा तपास थंडावला

## ॲड. गवांदे; पत्रकार परिषदेमध्ये दिली माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील वडगाव पान येथील राजेंद्र गडगेसह पाच जणांवर गुन्हा दाखल होवून दीड महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटला आहे. तरी देखील तीन आरोपींचा अद्यापही शोध लागलेला नाही. एकूणच या प्रकरणाचा तपास मंदावला असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य सचिव ॲड. रंजना पगार-गवांदे यांनी करत पोलीस, आरोग्य आणि अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

याबाबत ॲड. पगार-गवांदे यांनी संगमनेर शहरातील त्यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. गडगेबाबत राज्यभरातून अनेक तक्रारी असताना त्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पोलिसांकडे केली होती, त्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीची करणारा व्हिडिओ बदनामी अत्यंत चुकीच्या पद्धतीने समाज माध्यमांत पसरवण्यात आला होता. यातील संबंधितांची चौकशी होऊन त्यांना सहआरोपी करावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे. तसेच गडगे याने देवस्थानच्या नावाने (दत्तधाम सरकार) ट्रस्ट स्थापन केलेला आहे. ट्रस्ट संबंधाने खूप मोठे गैरव्यवहार झाले आहेत. सर्वसामान्य लोकांचे शोषण करून मोठी मालमत्ता जमवली या सर्व बाजूंनी तपास होणे गरजेचे आहे.

# सोनईत अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

## ५३ हजारांचा सुगंधी तंबाखूचा साठा जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : महाराष्ट्रात सुगंधी तंबाखूच्या उत्पादन व साठवणुकीवर बंदी असताना सोनई येथे अन्न व औषध प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने केलेल्या कारवाईत ५३ हजार ३५० रुपये किमतीचा सुगंधी तंबाखू व संबंधित साहित्याचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

असलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या अन्नसुरक्षा अधिकारी उज्वला रमण पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० जून रोजी सोनई-राहुरी रस्त्यावरील परिसरातील प्रशांतनगर सबस्टेशनजवळ पत्र्याच्या दोन खोल्यांवर छापा टाकण्यात आला. या प्रकारच्या कारवाई दरम्यान विविध सुगंधी तंबाखूचा मोठा साठा आढळून आला. याप्रकरणी सुहास अशोक भुसारी (वय २०, रा. सोनई) याच्याविरुद्ध सोनई ठाण्यात न्याय संहिता (बीएनएस) कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ आणि त्याअंतर्गत नियमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोलिसांनी जप्त केलेला माल

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये काळ्या रंगाच्या पॅकिंगमधील ५०० ग्रॅम वजनाची ६८ पाकिटे, ब्लू व सिल्व्हर रंगातील ६८ पाकिटे, गोल्डन रंगातील २२० पाकिटे, पाच किलो वजनाची १६ पाकिटे, सिल्व्हर रंगातील १६१ पाकिटे, तसेच विविध ब्रँडच्या तंबाखूची पाकिटे व अन्य साहित्याचा समावेश आहे. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ५३ हजार ३५० रुपये असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# जातीतील उपवर्गीकरण थांबवण्याचा मुद्दा मांडा

## संदीप मगर यांची आमदार ओगलेंकडे मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अनुसूचित जातीतील वर्गीकरण मुद्दा पावसाळी अधिवेशनामध्ये सर्व विरोधी पक्षातील आमदारांना घेऊन प्रभावीपणे मुद्दा मांडा व पुनर्विचार याचिका दाखल करण्यास सरकारला भाग पाडा, या मागणीचे निवेदन श्रीरामपूर तालुक्याचे आमदार हेमंत ओगले यांना भिम शक्ती जिल्हा अध्यक्ष संदीप मगर यांच्या हस्ते देण्यात आले.

मगर म्हणाले की, अनुसूचित जातीमध्ये ५९ जाती आहे. त्या जातीमध्ये राज्य सरकारला जातीजातीमध्ये वर्गीकरण करून सामाजिक तेड निर्माण करायचे आहे. अनुसूचित जातीमध्ये आजही काही समाजातील अनेक घटकांचा विकास व मूलभूत सुविधा पासून वंचित आहे. काही व्यक्ती व काही घटकांचा विकास झाला असल्याने संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास झाला असे म्हणता येणार नाही. तरी शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरणाचा मुद्दा उपस्थित केल्यास समाजात फूट पाडण्याची शक्यता असून सामाजिक एकात्मतेला धक्का पोहोचू शकतो. त्यामुळे अनुसूचित जातीमध्ये कोणत्याही प्रकारचे उपवर्गीकरण येऊ नये यासाठी आपण येत्या पावसाळी अधिवेशनामध्ये हा मुद्दा उपस्थित करावा.

यावेळी जिल्हा सचिव अल्ताफ शेख,महिला जिल्हा उपाध्यक्ष विजया बारसे, महिला शहराध्यक्ष रोहिणी बनसोडे, अध्यक्ष रेणुका गवळी, जिल्हा सहसंघटक विशाल तोरणे, तालुका युवक अध्यक्ष अनिल माघाडे उपस्थित होते.

# मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करणारा गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी सजगतेचे प्रत्यंतर देणारी धडाकेबाज कारवाई करत, अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोक्सोअंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपी हरिदास अर्जुन गायकवाड याला राहाता पोलिसांनी अवघ्या ४८ तासांच्या आत अटक केली. ही घटना शनिवार, दि. ६ जून रोजी दुपारी अडीच्या सुमारास घडली होती. गट क्र. ३४० परिसरात घटना घडली. पीडित मुलगी मैत्रिणी व बहिणींसोबत आईस्क्रीम आणण्यासाठी घराबाहेर गेली होती. ती घरी परतत होती. त्यावेळी आरोपी हरिदास गायकवाडने तोंड दाबून तिला जबरदस्तीने एका रिकाम्या फ्लॅटमध्ये नेले. मुलीचे हात व तोंड ओढणीने बांधून अत्याचाराचा प्रयत्न केला. पोलिस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगाने हालचाली केल्या. उपनिरीक्षक कोमल कुमावत, हवालदार मच्छिंद्र शिरसाठ, नाईक संदीप गडाख, कॉन्स्टेबल संभाजी शिंदे आणि होमगार्ड अभिषेक शिंदे यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने माहिती संकलित करत सापळा रचला. अखेर दि. १० रोजी रात्री उशिरा आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

# सैंदोरे यांची पीएसआयपदी नियुक्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**



**वडाळा महादेव** : येथील बोरावकेनगर मधील मेजर नंदकुमार संतराम सैंदोरे यांची केंद्रिय पोलीस दलामध्ये पोलीस सब इन्सपेक्टर म्हणून श्रीनगर येथे नियुक्ती झाली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

मेजर नंदकुमार सैंदोरे हे भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी स्टाफ सिलेक्शन कमिशनमार्फत स्पर्धा परीक्षा देऊन, पुणे येथील कठीण प्रशिक्षणानंतर त्यांची पीएसआय पदी निवड झाली. राहुरी तालुक्यातील मांजरी गावचे सुपुत्र असलेले मेजर नंदकुमार सैंदोरे यांनी २००४ ते २०२० या काळात भारतीय आर्मीत विविध ठिकाणी काम केले. मेजर नंदकुमार सैंदोरे यांनी सेवानिवृत्ती नंतर बंधू रवींद्र सैंदोरे यांच्याबरोबर प्रभावी शेतीकाम केले. मांजरी ग्रामस्थ, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, व्यक्तींनी त्यांचा सन्मान केला. तसेच बोरावकेनगर अक्षरवेलमधील श्रीराम अबॅकस क्लासमध्ये प्रमुख संचालक प्रा. पल्लवी नंदकुमार सैंदोरे व पालक, विद्यार्थ्यांनी मेजर नंदकुमार सैंदोरे यांचा यथोचित साकार केला.श्रीरामपूर येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांचे ते जावई असून त्यांचा वाचन संस्कृतीतर्फे सन्मान करण्यात आला.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घ, प्रामाणिक आणि समर्पित सेवेला मानवंदना देण्यासाठी एस.टी. को-ऑप बँक लि.च्या अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एसटी महामंडळातील विविध आगारातून निवृत्त झालेल्या सुमारे ६० कर्मचाऱ्यांचा सपत्निक सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.




> एसटी महामंडळ ही केवळ वाहतूक व्यवस्था नसून लाखो प्रवाशांच्या जीवनाशी जोडलेली सेवा आहे. या सेवेला बळकटी देण्यासाठी आपल्या सर्व निवृत्त सहकाऱ्यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. आज आपण ज्या ठिकाणी आहोत, त्यामागे त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सेवेला सलाम करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.
>
> **- बालाजी शिंदे, संचालक**

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे तसेच एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक व प्राथमिक शिक्षक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत जगताप उपस्थित होते.

एसटी को-ऑप बँकेचे संचालक बालाजी शिंदे आणि प्रवीण जाधव यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारप्रसंगी मान्यवरांनी निवृत्त कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला. याशिवाय एसटी बँकेचे शाखा व्यवस्थापक, कर्मचारी, एसटी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना आणि एसटी मधील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त करून सेवानिवृत्तांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अकोलेमध्ये सेतू यंत्रणेचा उडाला बोजवारा

## दाखले मिळतात संथगतीने; विद्यार्थ्यांची ससेहोलपट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर लागू केलेल्या नव्या जीपीआर प्रणालीमुळे अकोलेत सेतू केंद्र व महा-ई-सेवा केंद्रचालकांचे कामकाज विस्कळीत झाल्यामुळे या सेवेचा बोजवारा उडाला आहे. वीस दिवसांपासून महाऑनलाईन पोर्टल अत्यंत धीम्या गतीने व सुरळीत चालत नाही. यामुळे महा-ई-सेवा केंद्र चालकांसह विद्यार्थी व पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

सध्याचा कालावधी विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक प्रवेशाचा आहे. महा-ई-सेवा केंद्रांवर शैक्षणिक दाखले व प्रतिज्ञापत्र नोंदविण्यासाठी गर्दी होत आहे. परंतु महाऑनलाईन सेवा कार्यालयीन काळात बंद होत आहे. यामुळे सुविधा देण्यास सेतू केंद्र चालक असमर्थ ठरत आहेत. यामुळे नागरिकांची प्रचंड प्रमाणात ससेहोलपट होत आहे. केंद्र चालकांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. महाऑनलाईन प्रणाली सुरळीत करण्याबाबत प्रयत्न करावेत, असे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले आहे, असे सर्व सेतू सेवा केंद्र चालकांनी सांगितले. पोर्टलची संथ गती, वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, बदललेली कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया आणि अर्ज मंजुरीतील विलंब यामुळे नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. महाविद्यालयीन प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी भरतीसह विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले वेळेत मिळत नाहीत. अर्ज भरताना पोर्टल अनेकदा हँग होते किंवा अचानक लॉग आऊट होते. यामुळे भरलेली माहिती पुन्हा टाकावी लागते. दिवसभर मोठी गर्दी असताना, पोर्टलचा प्रतिसाद अत्यंत संथ मिळतो. यामुळे कामाचा वेग मंदावला आहे. सुविधा देण्यास सेतू केंद्र चालक असमर्थ ठरत आहेत. यामुळे नागरिकांची प्रचंड प्रमाणात ससेहोलपट होत आहे.

नव्या प्रणालीत अधिवास व राष्ट्रीयत्व दाखल्यांसाठी पडताळणी प्रक्रिया अधिक कठोर करण्यात आली आहे. पूर्वी काही दिवसांत मिळणारे दाखले आता अनेक आठवडे प्रलंबित राहत असल्याचे ते सांगतात.

### चुकीची माहिती; जबाबदारी अर्जदारावर

स्वयंघोषणापत्राच्या माध्यमातून प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात आला असला तरी चुकीची माहिती भरल्यास जबाबदारी अर्जदारावर येत असल्याने अनेक नागरिक अतिरिक्त कागदपत्रे जोडण्याचा आग्रह धरतात. यामुळे प्रक्रिया सोपी होण्याऐवजी अधिक गुंतागुंतीची होत आहे, असे केंद्रचालकांचे म्हणणे आहे.

# आ. कर्डिलेंच्या जनता दरबारात समस्यांचे निवारण

## विज, रस्ते, नोकरीच्या प्रश्नांवर थेट संवाद; जनतेच्या अडचणींवर तत्काळ तोडगा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याची भूमिका घेत आमदार अक्षय कर्डिले हे राहुरी तालुक्यात जनतेचा विश्वास संपादन करताना दिसत आहेत. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात दर गुरुवारी आयोजित करण्यात येणाऱ्या जनता दरबारला दिवसेंदिवस मोठा प्रतिसाद मिळत आहे.

दि. ११ जून रोजी झालेल्या जनता दरबारातही तालुक्याच्या विविध भागांतून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी विजेच्या रोहित्रांचा प्रश्न, खराब व खडतर रस्ते, शेतजमिनींच्या बांधांवरील वाद, बेरोजगारी, शासकीय कामांतील अडथळे आणि इतर नागरी समस्यांबाबत नागरिकांनी थेट आमदारांसमोर आपली मते आणि तक्रारी मांडल्या. आ. कर्डिले यांनी प्रत्येक नागरिकाचे म्हणणे संयमाने ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. अनेक प्रकरणांमध्ये जागेवरच मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

हा उपक्रम केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता प्रत्यक्ष तक्रार निवारणाचे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अनेक नागरिकांनी आपल्या अडचणींना त्वरित प्रतिसाद मिळाल्याचे सांगत समाधान व्यक्त केले. त्यामुळे जनता दरबार हा जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवणारा आणि लोकप्रतिनिधीशी थेट संवाद साधण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. राहुरी तालुक्यातील नागरिकांसाठी हा जनता दरबार आशेचा किरण बनत असून, हा उपक्रम पुढील काळातही अधिक प्रभावीपणे सुरू राहावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

### आ. कर्डिलेंची कार्यशैली चर्चेत

स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी जपलेली लोकसंपर्काची परंपरा पुढे नेत आ. अक्षय कर्डिले हे जनतेशी असलेले नाते अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. लोकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्याची भूमिका त्यांच्या कार्यशैलीतून दिसून येत आहे.

# उंदीरगावच्या लेकीची पोलीस दलात वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : उंदीरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या पूजा रवींद्र सरोदे हिची पोलीस दलात निवड झाल्याबद्दल महारुद्र हनुमान सेवेकरी वर्गाच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. उंदीरगावातील पहिलीच मुलगी पोलीस दलात भरती झाल्याने तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पूजा सरोदे हिने मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले असून, तिच्या यशामुळे गावातील तरुण-तरुणींना प्रेरणा मिळाली आहे. पोलीस दलात निवड होऊन तिने आपल्या कुटुंबासह उंदीरगावचे नाव उज्ज्वल केले आहे.

यावेळी महारुद्र हनुमान सेवेकरी वर्ग मित्र मंडळाच्या वतीने तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सत्कार प्रसंगी मंडळाचे सदस्य दिलीप गायके, राजेंद्र बांद्रे, संतोष वाकचौरे, शरद आव्हाड, योगेश रोकडे, प्रतीक गायके, विश्वनाथ दिवसे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी पूजा सरोदे हिच्या यशाचे कौतुक करत तिच्या कार्यकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी सूर्योदय पतसंस्थेचे संस्थापक तसेच महारुद्र हनुमान सेवेकरी वर्गाचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष दिलीप गायके यांनी पूजा सरोदे हिच्या यशाचे कौतुक करत ग्रामीण भागातील मुला-मुलींनी शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर मोठी स्वप्ने पूर्ण करावीत, असे आवाहन केले.

# राहुरी पोलीस ठाण्याची धुरा पीआय रवींद्र देशमुखांकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांची बदली श्रीगोंदा येथे करण्यात आल्यानंतर त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी राहुरी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. या बदल्यांनंतर आता राहुरीतील पोलीस प्रशासनाची दिशा आणि आगामी काळातील कामकाजाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नवीन पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासमोर अनेक महत्त्वाची आव्हाने उभी आहेत. तालुक्यातील वाढती गुन्हेगारी, अवैध धंद्यांवर नियंत्रण आणि अलीकडेच घडलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या विटंबना प्रकरणातील आरोपींचा शोध घेणे या मुद्द्यांकडे नागरिकांचे विशेष लक्ष आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांमध्ये राहुरीचे संजय ठेंगे यांची श्रीगोंदा येथे बदली करण्यात आली. ठेंगे यांनी आपल्या कार्यकाळात अनेक उल्लेखनीय कामे केली असल्याची चर्चा राहुरी परिसरात आहे. विशेषतः अपहरण झालेल्या शंभराहून अधिक अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या नातेवाईकांकडे सुपूर्द करण्याचे काम त्यांनी केले. याशिवाय तालुक्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला. पदभार सोडण्यापूर्वी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या विटंबना प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्यास ११ हजार रुपयांच्या बक्षिसाची घोषणाही केली.

राहुरी तालुक्यात नागरिक चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठिंबा देतात, तर कामकाजात त्रुटी आढळल्यास प्रश्नही उपस्थित करतात. त्यामुळे नव्या नेतृत्वाखाली राहुरी पोलीस ठाण्याची कामगिरी कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अवैध धंद्यांवर कारवाईचे आव्हान

दरम्यान, नव्याने पदभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी सुरुवातीला पोलीस ठाण्याच्या अंतर्गत कामकाजाचा आढावा घेणे, कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती समजून घेणे आणि स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. त्यानंतरच कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखता येऊ शकणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# 'सीसीटीव्हीत आरोपी दिसूनही अटक नाही'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील राशीन परिसरात शेतकऱ्याच्या गोठ्यातून सुमारे दीड लाख रुपये किमतीची म्हैस चोरीला जाऊन तब्बल दीड महिना उलटला, तरीही आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे, चोरीची संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून आरोपींची ओळखही पटल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकरणी शशिकांत दत्तात्रय साळवे (रा. राशीन, ता. कर्जत) यांनी राशीन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी त्यांच्या घरामागील गोठ्यात काळ्या रंगाची म्हैस बांधून ठेवली होती. दि. २३ एप्रिल २०२६ रोजी रात्री गोठ्यात बांधलेली म्हैस अज्ञात चोरट्यांनी लंपास केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी गोठ्यातील म्हैस गायब असल्याचे लक्षात आल्यानंतर शेतकऱ्यांनी परिसरात शोधाशोध केली. मात्र म्हैस सापडली नाही. यावेळी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता दोन व्यक्ती म्हैस घेऊन जात असल्याचे स्पष्ट दिसून आले. या फुटेजच्या आधारे संकेत विनोद भिंगारदिवे, बापू रोहिदास कानगुडे व अन्य दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, गुन्हा दाखल होऊन दीड महिना उलटूनही आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. चोरीला गेलेली म्हैस अद्याप मिळून आलेली नसल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

# कवींच्या शब्दफुलांनी रंगले संमेलन

## रसिकांना मिळाली दर्जेदार कवितांची मेजवानी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : मानवी मनातील भाव-भावना, संवेदना आणि जीवनानुभवांना शब्दरूप देण्याचे सामर्थ्य कवितेत असते. संवेदनशील मनाच्या व्यक्तीच दर्जेदार कविता लिहू शकतात. आजच्या काळात मोठ्या प्रमाणावर कविता लिहिल्या जात असल्या तरी आशयघन, सकस आणि काळाच्या कसोटीवर टिकणाऱ्या कविता दीर्घकाळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवतात. त्यामुळे उत्तम काव्य निर्मितीसाठी सातत्यपूर्ण वाचनाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रकाश होळकर यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात जाधव लॉन्स येथे निमंत्रितांचे काव्य संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या काव्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश होळकर होते.

यावेळी चित्रपट गीतकार कवी प्रकाश घोडके आणि पाठ्यपुस्तक कवी हनुमंत चांदगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, प्रा. माणिकराव विधाते, महादेव गवळी, सिद्धनाथ मेटे, सचिन चोबे, पांडव पुरी, संतोष कानडे, विलास साठे यांच्यासह आदी साहित्यिक व मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, पुणे येथील ज्येष्ठ कवयित्री माधुरीताई मरकड यांच्या अध्यक्षतेखाली स्व. अरुण आहेर कवी कट्ट्यावर खुल्या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, प्रा. शशिकांत शिंदे आणि सुभाष सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# भरचौकात शेतकऱ्याची रोकड लांबविली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : येथील मुख्य पेठेत काल दिवसाढवळ्या एका शेतकऱ्याला गाठून चोरट्यांनी बळजबरीने पैशांचे बंडल हिसकावून नेल्याची खळबळजनक घटना घडली आहे. चोरट्यांनी भरबाजारात सुमारे १० हजार रुपयांची रोकड लंपास केली असून, या धाडसी चोरीमुळे खर्डा शहरातील व्यापारी वर्ग आणि नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ११ जून रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास बाळगव्हाण येथील रहिवासी अण्णासाहेब गोपाळघरे यांनी येथील सेंट्रल बँकेतून २ लाख रुपयांची रोकड काढली आणि ती एका पिशवीत ठेवली. त्यानंतर ते कपडे शिवण्यासाठी दुचाकीवरून खर्डा शहरातील मेन रोडवरील एका टेलरिंगच्या दुकानापाशी आले. त्यांनी दुकानासमोर गाडी पार्क करताच, पाठीमागून मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात भामट्यांनी त्यांना गाठले.

चोरट्यांनी आधी गोपाळघरे यांना तुम्ही औषधाचा व्यापार करता का? असा प्रश्न विचारून चकवा देण्याचा प्रयत्न केला. त्यावर गोपाळघरे यांनी मी शेतकरी माणूस आहे, माझा कुठलाही व्यवसाय नाही, असे सांगितले. मात्र, चोरट्यांची नजर त्यांच्याकडील पिशवीवर होती. पिशवीत काय आहे दाखवा, असे म्हणत चोरट्यांनी दबाव आणला. गोपाळघरे यांनी पिशवीची चेन उघडून दाखवताच चोरट्यांनी थेट पिशवीत हात घालून पैसे हिसकावण्याचा प्रयत्न केला.

पैसे हिसकावताच अण्णासाहेब गोपाळघरे यांनी तात्काळ चोरट्यांना घट्ट पकडून ठेवले आणि हा चोरटा माझे पैसे घेऊन पळून चालला आहे.

# आ. संग्राम जगताप यांच्या कार्याची प्रशंसा

## प्रा. विधाते यांच्याकडून गौरव; वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आ. संग्राम जगताप यांनी विकासकामांसोबतच समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांना आधार देण्याचे कार्य केले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केवळ पायाभूत सुविधांवर भर न देता सामाजिक प्रश्नांकडेही संवेदनशीलतेने पाहिले. राजकारणातून समाजकारणाची वाट चालत जनसेवेचे कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अशा लोकप्रतिनिधींचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे प्रतिपादन प्रा. माणिक विधाते यांनी केले.

हरदिन मॉर्निंग ग्रुप आणि भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. तसेच शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर बालभवनमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याशिवाय रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजनचे वाटप करण्यात आले. शहराचे आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, समाजसेविका किरणताई संपत बारस्कर आणि माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन मन्नूशेठ झंवर, सतीश ढवण, गजेंद्र भांडवलकर, योगेश एरंडे, प्रांजली सपकाळ, गायत्री मुंढे, जयश्री पोटे, ह.भ.प. पूजाताई अळकुटे-माने, माधवी माळगे, संगीताताई सपकाळ, गुलनाज शेख, लक्ष्मीताई पारधे, सुरेखाताई आमले, संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, जहीर सय्यद, ईवान सपकाळ, शिवम भंडारी, ताराचंद ठोकळ आदी उपस्थित होते.



> आ. संग्राम जगताप यांनी नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. शहर विकासाबरोबरच भिंगार उपनगराच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. सुमारे १० कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकासकामांना चालना मिळाली. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग भवन उभारून नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा नवा पर्याय उपलब्ध करून दिला. भिंगारच्या विकासासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे.
>
> – **संजय सपकाळ**

# शेवगावात कृष्ण बल्लाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : भाचीला मारहाण का करता, असा जाब विचारण्यासाठी गेलेल्या कृष्ण बल्लाळ यांच्यावर आठ ते दहा जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बल्लाळ यांच्यावर प्रथम शेवगाव येथील बडे हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तींनी कृष्ण बल्लाळ यांची भाची हिला मारहाण केल्याने त्याबाबत विचारणा करण्यासाठी बल्लाळ गेले होते. यावेळी आरोपींनी वाद घालत मला मुलगा नाही, तुलाही मुलगा ठेवणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर अचानक आठ ते दहा जणांनी एकत्र येत बल्लाळ यांच्यावर हल्ला चढविला.

या हल्ल्यात विनोद घाडगे याने लाकडी दांडके, लोखंडी गज व रॉडच्या साहाय्याने कृष्ण बल्लाळ यांच्या डोक्यावर वार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तुला जिवंत सोडणार नाही, जीव मारून टाकू, अशा प्रकारच्या जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

हल्ल्यात गंभीर दुखापत झाल्याने कृष्ण बल्लाळ यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. शेवगाव येथील बडे हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचारानंतर प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

# 'ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' पुस्तिकेचे प्रकाशन

## हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक अहिल्यानगर घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा : उपमहापौर जाधव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : वाढते तापमान, प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि झपाट्याने कमी होत चाललेले हरित क्षेत्र ही आजच्या काळातील गंभीर आव्हाने बनली आहेत. भविष्यात हीच आव्हाने अधिक तीव्र स्वरूपात शहरांसमोर उभी राहणार असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मनपा उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून, द्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या माहिती व जनजागृती पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले.

या प्रकाशन सोहळ्यास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, उद्योजक जनक अहुजा, उद्योजक आदेश चेगेडिया, राजेंद्र बलदोटा, नगरसेवक निखिल वारे, अभिजीत बोरुडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्योजक जनक अहुजा म्हणाले की, आज मानवजातीसमोर वाढते तापमान, प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि घटते हरित क्षेत्र ही गंभीर समस्या उभी ठाकली आहे. अहिल्यानगरसारख्या झपाट्याने विस्तारत असलेल्या शहरासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे. शहराचा विस्तार होत असताना सिमेंटची जंगले वाढत आहेत; मात्र पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अर्बन फॉरेस्ट ही संकल्पना राबविण्याची गरज आहे.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सुरू केलेली नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहीम ही अत्यंत कौतुकास्पद असून या माध्यमातून शहरातील वृक्षसंख्या वाढण्यास निश्चितच मदत होईल. वृक्षारोपण ही केवळ एक मोहीम नसून काळाची गरज आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. निसर्गावर प्रेम करणे म्हणजे आपल्या भविष्यातील पिढ्यांचे संरक्षण करणे होय, असेही त्यांनी नमूद केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, अहिल्यानगरला हरित, स्वच्छ आणि आदर्श शहर बनविण्यासाठी प्रत्येक नगरकराचा सहभाग आवश्यक आहे. नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी या मोहिमेमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. प्रत्येकाने एक झाड लावले तर संपूर्ण शहर हिरवागार होण्यास वेळ लागणार नाही. स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर ही आपल्या सर्वांची सामूहिक संकल्पना असली पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, या मोहिमेच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन होईल. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी, शहराचे तापमान कमी करण्यासाठी आणि पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या माहिती व जनजागृती पुस्तिकेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये वृक्षांविषयी जागरूकता निर्माण केली जाईल आणि पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ उभी राहील. आदेश चेगेडिया म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे.

> आज विज्ञान, तंत्रज्ञान आणि एआय कितीही पुढे गेले तरी शुद्ध हवा, ऑक्सिजन आणि पर्यावरणीय संतुलनासाठी वृक्षांना कोणताही पर्याय नाही. एआय आपले जीवन सुलभ करू शकते, मात्र निसर्गाची जागा घेऊ शकत नाही. याच विचारातून नगरकरांमध्ये पर्यावरण रक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत विद्यार्थी वृक्ष दत्तक योजना राबविण्यात येणार आहे.
>
> – **ॲड. धनंजय जाधव, उपमहापौर**

# नवीन वाहन खरेदीला स्थगिती द्या : सिरसुल

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर** : आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशात भविष्यात पेट्रोल व डिझेलच्या पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून त्यावर तातडीने उपाययोजना म्हणून नवीन वाहन खरेदीवर काही काळासाठी स्थगिती आणावी, तसेच इंधनाच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठोस धोरण आखावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या स्वाती सिरसुल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

सिरसुल यांनी म्हटले आहे की, आज भारतात करोडोच्या संख्येने विविध प्रकारची वाहने पेट्रोल व डिझेलवर चालतात. अमेरिका, इस्रायल, इराण तसेच तेल उत्पादक देशांमधील तणावपूर्ण आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला इंधन पुरवठ्याचा गंभीर प्रश्न भविष्यात भेडसावू शकतो. त्यामुळे इंधनाचा अनावश्यक वापर कमी करणे आणि नवीन वाहनांच्या खरेदीवर काही काळ निर्बंध आणणे अत्यंत आवश्यक आहे.

देशातील इंधन वापराच्या वाढत्या प्रमाणाला आपण सर्वच जबाबदार आहोत. आज अनेक कुटुंबांमध्ये सदस्यांपेक्षा वाहनांची संख्या अधिक असल्याचे चित्र दिसून येते. चार सदस्यांच्या कुटुंबात सहा-सात दुचाकी आणि दोन-तीन चारचाकी वाहने असणे ही बाब सामान्य झाली आहे. वाहनांसाठी जागा नसल्याने अनेकजण सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांच्या कडेला गाड्या उभ्या करतात. काही लोक केवळ श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी महागडी वाहने खरेदी करतात.

# रात्रभर जागणारी पिढी, गप्प होत चाललेले पालक

## स्क्रीनच्या उजेडात हरवत चाललेला संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** रात्रभर जागणारी तरुण पिढी आणि त्यांच्या आरोग्याबाबत चिंतेत असलेले पालक, हे आजच्या समाजातील एक वास्तव चित्र बनले आहे. घरातील सर्व दिवे बंद झाल्यानंतरही एखाद्या खोलीतून मोबाईलच्या स्क्रीनचा अंधुक प्रकाश बाहेर पडताना दिसतो. हातात मोबाईल, कानात इयरफोन आणि वेळेचे भान हरवलेली मुलेहे दृश्य आता अनेक कुटुंबांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग झाले आहे.

रात्रभर जागरणे, सकाळी उशिरा उठणे आणि दिवसाची सुरुवातच दुपारच्या सुमारास होणे, ही जीवनशैली अनेक तरुणांनी स्वीकारली आहे. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले, तरी मानवी शरीराच्या मूलभूत गरजा मात्र बदललेल्या नाहीत. शरीराला विश्रांती, मेंदूला पुनरुज्जीवन आणि म नाला शांत झोप आवश्यकच असते. मात्र आजची पिढी जणू स्वतःच्या शरीराशीच स्पर्धा करत असल्याचे चित्र दिसते. एकेकाळी सुट्ट्यांमधील पहाट, पक्ष्यांचा किलबिलाट, गच्चीवरील गप्पा आणि सूर्योदयाचे दर्शन हा जीवनाचा अविभाज्य भाग होता. आज मात्र अनेक मुलांना सकाळच्या प्रसन्नतेचा अनुभवच मिळत नाही. त्याचा परिणाम केवळ आठवणींवर नाही, तर त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही होत असल्याची चिंता तज्ज्ञ व्यक्त करतात.

पालक सुरुवातीला प्रेमाने समजावतात, नंतर आग्रह करतात आणि शेवटी रागावतातही. मात्र प्रत्येक गोष्टीचे उत्तर तयार असलेल्या नव्या पिढीसम ोर त्यांचे शब्द निष्प्रभ ठरू लागतात. ''आम्हाला माहिती आहे'', ''सगळेच असे करतात'' किंवा ''आमच्या जनरेशनचे आयुष्य वेगळे आहे'' अशा प्रतिक्रिया ऐकून पालक शांत होतात; पण त्यांची चिंता मात्र कमी होत नाही. अपुरी झोप, शारीरिक हालचालींचा अभाव, स्क्रीनचा वाढता वापर आणि मानसिक ताण यांची छोटी बीजे नकळत रुजत जातात. त्याचे परिणाम लगेच दिसत नसले, तरी भविष्यात एकाग्रता कमी होणे, चिडचिड वाढणे, संवादात दुरावा निर्माण होणे आणि मानसिक अस्थिरता यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

पालकांची सर्वात मोठी वेदना मात्र मुलांच्या आरोग्याची नसते; ती असते मुलांपर्यंत स्वतःचे प्रेम आणि अनुभव पोहोचवता न येण्याची. आयुष्यभर मुलांच्या प्रत्येक भावनेचा अर्थ समजून



घेणारे आई-वडील, एक दिवस ''तुम्हाला काहीच समजत नाही'' हे वाक्य ऐकतात आणि आतून जखमी होतात. आई-वडील हे मुलांच्या स्वप्नांचे पहिले साक्षीदार असतात. त्यांच्या यशासाठी प्रार्थना करणारे आणि अपयशाने आतून तुटणारेही तेच असतात. त्यामुळे ''रात्रभर जागू नकोस'' हा त्यांचा सल्ला नियंत्रणासाठी नसतो; तो प्रेम, काळजी आणि अनुभवातून आलेला असतो.

मात्र जेव्हा सततच्या समजावणीनंतरही काही बदल होत नाही, तेव्हा पालक हळूहळू गप्प होतात. हे गप्प होणे म्हणजे पराभव नसतो; तो एक दुःखी स्वीकार असतो. कारण त्यांच्या मनातील काळजी कधीच संपत नाही. मुलांचे वय वाढते, पण आई-वडिलांच्या चिंतेचे स्वरूपच फक्त बदलते.

आजच्या तरुण पिढीने स्वतःचे विचार ठेवावेत, स्वतःचे निर्णय घ्यावेत आणि स्वतःच्या पद्धतीने आयुष्य जगावे; मात्र कधीतरी आई-वडिलांच्या शब्दांमागील प्रेमही ऐकावे. कारण आयुष्यात एक वेळ अशी येते, जेव्हा त्यांच्या प्रत्येक सल्ल्याचा अर्थ नव्याने उमगतो. आजही अनेक घरांमध्ये एखादी आई रात्री उठून मुलाच्या खोलीत डोकावते आणि एखादा बाबा सकाळी उशिरापर्यंत झोपलेल्या मुलाकडे पाहून न बोलता निघून जातो. त्यांच्या मनात मात्र एक नि:शब्द प्रार्थना सुरू असते''आमच्या मुलांना चांगले आरोग्य, योग्य समज आणि सुखी आयुष्य लाभू दे.'' जगातील सर्वात निःस्वार्थ प्रेम कोणते, या प्रश्नाचे उत्तर आजही तेच आहेपालकांचे प्रेम. ते कधी उपदेशाच्या रूपात, कधी काळजीच्या रूपात, तर कधी पूर्णपणे गप्प झालेल्या शब्दांतूनही व्यक्त होत राहते. आणि हीच काळजी त्यांच्या प्रेमाची सर्वात खरी भाषा ठरते.

# ऋषी छल्लारे फाउंडेशनच्यावतीने बस सवलत कार्डचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील ऋषी छल्लारे फाउंडेशनच्यावतीने भोकर व परिसरातील गावातील विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना बस सवलत (एन.सी.एम.सी.) कार्डचे नुकतेच वाटप करण्यात आले. लोकनेते माजी आ. भानुदास मुरकुटे व युवा नेते नीरज मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली या फाउंडेशनचे कामकाज सुरू असून जवळजवळ १००० लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले.

याकामी ऋषी छल्लारे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बांधकाम कामगार नेते गणेश उर्फ किशोर छल्लारे यांनी लाभार्थी व्यक्तींना कार्ड काढून देणेकामी फाउंडेशनच्या मार्फत सहकार्य केले. याप्रसंगी लाभार्थींना कार्डचे वाटप करताना ऋषी छल्लारे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश उर्फ किशोर छल्लारे, हरेगावचे माजी सरपंच दीपक नवगिरे, ओमकार छल्लारे, दिगंबर छल्लारे, बाळासाहेब मते, बाळासाहेब रूपटक्के, अनिल वाघुंबरे, कृष्णा केशर कर, अशोक थोरात, बाबुराव अमोलिक, राजेंद्र कांगुणे, सिताराम खराडे, शकुंतला चौधरी, मीना झुरंगे, इंदुबाई अमोलिक, मालनबाई राठोड आदींसह लाभार्थी वाटप प्रसंगी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ऋषी छल्लारे फाउंडेशन मार्फत पी. एम किसान योजनेची इ-केवायसी घेण्याचा लाभही शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन गणेश छल्लारे यांनी केले आहे.





**शिरसगाव : रुचिता संदीप वाघमारे तन्वी दत्तात्रय बकाल, श्वेता नवनाथ गुंड या तीन मुलींनी इयत्ता १० वी मध्ये शिरसगाव येथे घवघवीत यश संपादन केल्याबद्दल ग्रामपचायत शिरसगावच्या वतीने त्यांचा सत्कार अध्यक्ष गणेशराव मुदगुले यांनी केला त्यावेळी संरपच राणीताई वाघमारे उपसरपंच संजय यादव माजी . संरपच शांतवन गायकवाडं गणेश गवारे दत्तात्रय बकाल संदिप वाघमारे नवनाथ गुंड वेणूनाथ पवार राजेंद्र यादव आण्णासाहेब ताके आदी उपस्थित होते**

# पंतप्रधान मोदींच्या सेवेची १२ वर्षे व ना. विखेंच्या दीर्घायुष्यासाठी दर्गाहवर चादर अर्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या यशस्वी सेवेची १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तसेच येत्या १५ जून रोजी वाढदिवस असणारे अहिल्यानगर जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दीर्घायुष्यासाठी श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथील सय्यद बाबा व गरीबशाह बाबा दर्गाहवर चादर अर्पण करून विशेष प्रार्थना करण्यात आली.

हा कार्यक्रम नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी आणि



ऊ.नगर जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर,जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांच्या सूचनेनुसार श्रीरामपूर भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, प्रदेश उपाध्यक्ष फत्तुभाई सय्यद, भाजपाचे ज्येष्ठ नेते जिल्हा उपाध्यक्ष दीपक अण्णा पटारे, माजी जि.प. सभापती शरद नवले, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, प्रफुल्ल डावरे, गिरीधर आसणे, शंकर मुठे, मिलिंदकुमार साळवे, बाळासाहेब हरदास, महेंद्र पटारे, विजय आखाडे, इस्माईल भाई शेख सलूनवाले, मुनीर शेख,पुष्पलता ताई हरदास, आछडा भाभी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हा सहसंयोजक साजिद शेख, श्रीरामपूर शहर मंडल अध्यक्ष आसिफ पोपटिया, श्रीरामपूर ग्रामीण अध्यक्ष अजिज शेख, मोहसीन सय्यद, माजित पठाण आदींनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी भाजपाचे हिंदू-मुस्लिम पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि देशसेवेसाठी प्रार्थना केली. या अनोख्या उपक्रमाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेत सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

# शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याचा प्रयत्न

## कारवाई न झाल्याने पोलिस अधीक्षकांकडे तक्रार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** तालुक्यातील नजीक बाभुळगाव येथे एका महिलेसह तिच्या मुलगा, भाऊ व दीर यांना शिवीगाळ, मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करत संबंधित आरोपींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.

याबाबत सौ. वैशाली सुभाष घाडगे यांनी पोलिस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, विनोद दिनकर घाडगे व त्यांच्या कुटुंबीयांनी पूर्वीही धम क्या दिल्या होत्या. तसेच ८ जून २०२६ रोजी सायंकाळच्या सुम ारास फिर्यादीचा मुलगा घरी येत



असताना काही आरोपींनी त्याला अडवून शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी, त्यांचे पती व भाऊ यांनी जाब विचारला असता आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करून लोखंडी रॉड व इतर वस्तूंनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या हल्ल्यात फिर्यादीच्या भावाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच दीरालाही मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून पंचनामा करण्यात आला असला तरी अद्याप संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. आरोपींकडून वारंवार धम क्या दिल्या जात असून आपल्या कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, तसेच कुटुंबाला संरक्षण द्यावे, अशी मागणी पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट)च्या वतीने आंदोलनाचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. मारहाण व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत संबंधित आरोपींवर कारवाईची मागणी करणारे निवेदन पोलिस अधीक्षक कार्यालयात सादर करण्यात आले.

# रुग्णांना सुविधा द्या, कारभार सुधारा

## रिक्त पदे भरण्याची मागणी; अन्यथा २२ जूनला सत्याग्रह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** येथील उपजिल्हा रुग्णालयातील कथित अनागोंदी कारभार, रुग्णांना मिळणाऱ्या अपुऱ्या सुविधा, औषध खरेदीतील कथित गैरव्यवहार तसेच विविध प्रशासकीय बाबींची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते किशोर हरेर व शहानवाज शेख यांनी केली आहे.

या मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास २२ जून रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हा




### संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करा

महिलांच्या नसबंदी शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या काही रुग्णांना भीती दाखवून शहरातील खासगी रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाल्यानंतर किती रुग्णांनी इतरत्र उपचार घेतले, याची नोंद तपासून संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

शल्यचिकित्सक संजय घोगरे यांच्याकडेही देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात गेल्या काही वर्षांपासून स्वच्छतेच्या प्रश्नासह विविध मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित सुधारणा झाल्या नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. रुग्णालयातील प्रशासनिक कामकाज आणि सुविधांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रुग्णालयात आवश्यक औषधे उपलब्ध नसल्याचे सांगून काही रुग्णांकडून औषधांसाठी पैसे घेतले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यानंतर संबंधित औषधांचे बिल शासनाकडे सादर करून खर्च दाखविला जात असल्याचा दावा करण्यात आला असून या संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# लष्करी बॉम्बचा स्फोट; शेळ्या चारणाऱ्याचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** खारे कर्जुने (ता. नगर) शिवारातील लष्करी सराव क्षेत्रात न फुटलेल्या बॉम्बचा अचानक स्फोट होऊन शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (१० जून) दुपारी घडली. या स्फोटात एक शेळीही मृत्युमुखी पडली असून दुसरी शेळी जखमी झाली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संजय दशरथ गायकवाड (वय ५२, रा. खारे कर्जुने, ता. नगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. गायकवाड हे वीटभट्टीवर मजुरीचे काम करत होते. काम नसलेल्या दिवशी ते शेळ्या चारण्यासाठी गावालगतच्या परिसरात जात असत.

खारे कर्जुने गावालगत लष्कराचे 'के. के. रेंज' हे युद्धसराव क्षेत्र असून गेल्या काही दिवसांपासून तेथे लष्करी सराव सुरू होता. सरावाबाबत लष्कराने ग्रामपंचायतीला पूर्वसूचना दिली होती. तसेच ग्रामपंचायतीमार्फत ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना संबंधित परिसरात जाणे



टाळण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मात्र, मंगळवारी गायकवाड शेळ्या चारण्यासाठी या भागात गेले असता त्यांना लष्करी सरावादरम्यान न फुटलेला बॉम्ब आढळून आला. तो निकामी झाला असावा, असा समज करून त्यांनी तो उचलून दगडावर आदळण्याचा प्रयत्न केला. त्याच क्षणी बॉम्बचा भीषण स्फोट झाला. स्फोट इतका तीव्र होता की गायकवाड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यांच्या जवळ असलेली एक शेळीही दगावली, तर दुसरी शेळी गंभीर जखमी झाली.

स्फोटाचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. त्यांनी तातडीने पोलिस आणि नातेवाइकांना माहिती दिली. एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

लष्करी सराव सुरू असलेल्या क्षेत्रात नागरिकांनी प्रवेश करू नये, यासाठी प्रशासन आणि ग्रामपंचायतीकडून वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र न फुटलेल्या स्फोटक वस्तूची धोकादायकता लक्षात न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. या घटनेनंतर लष्करी सराव क्षेत्राच्या सुरक्षेबाबत आणि नागरिकांच्या जनजागृतीबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित होत आहेत.

# कर्जमाफी योजनेवर शेतकऱ्यांचा एल्गार; 'सरकारची घोषणा दिशाभूल करणारी'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत अनेक अटी व शर्ती घालण्यात आल्याने मोठ्या संख्येने शेतकरी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहणार असल्याची तीव्र टीका करण्यात आली. ही योजना दिशाभूल करणारी असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा न काढणारी असल्याचा आरोप करत विनाअट व सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्याची मागणी करण्यात आली.

शेवगाव येथे भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने तहसील कार्यालयावर शुक्रवारी निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलक शेतकरी व कार्यकर्त्यांनी शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून



सोडला. आंदोलनाचे नेतृत्व भाकपचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी केले. त्यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका करत कर्जमाफी योजनेतील अटी-शर्तींमुळे प्रत्यक्ष लाभ मिळणे कठीण असल्याचा आरोप केला. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार नसून केवळ बँकांच्या थकीत कर्जवसुलीचा मार्ग मोकळा होईल, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे अटी दूर करून सरसकट कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांच्या वाढत्या किमती, कृत्रिम तुटवडा आणि बियाण्यांच्या उपलब्धतेबाबतही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांना खतांसाठी रांगा लावाव्या लागत असून काही ठिकाणी मुक्काम करूनही खते मिळत नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी निदर्शनास आणले. त्यामुळे खतांचा पुरवठा सुरळीत व स्वस्त दरात करण्याची मागणी करण्यात आली. तसेच कपाशी व इतर खरीप पिकांसाठी बियाणे अनुदानित व सवलतीच्या दरात उपलब्ध करून द्यावीत, अशीही मागणी करण्यात आली.

# रांधे येथे स्वामी भक्तांचा महासागर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** तालुक्यातील रांधे येथे गुरुवारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी स्वामी भक्तांचा अक्षरशः महासागर उसळला. तब्बल १२ ते १५ हजार भाविकांनी उपस्थिती लावत विक्रमी गर्दीची नोंद केली. सायंकाळी वाढत गेलेल्या गर्दीमुळे संपूर्ण परिसर ''श्री स्वामी समर्थ'' च्या जयघोषाने दुमदुमून गेला. गुरुवार म्हटला की स्वामीभक्तांची रांधेतील ओढ ही परंपरा आता अधिकच दृढ होत असून शेतकरी, कामगार, व्यापारी आणि वारकरी मोठ्या संख्येने दर्शनासाठी दाखल झाले.

# पणन महासंघाचे अध्यक्ष पानसरेंवर अविश्वास प्रस्ताव मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे:** पणन संघातील दीर्घकाळ सुरू असलेला अंतर्गत वाद अखेर निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, संचालक मंडळाने आज अविश्वास प्रस्ताव मंजूर करत दत्तात्रय पानसरे यांना अध्यक्षपदावरून दूर केले आहे. रावळ आणि पानसरे यांच्यातील संघर्ष, तसेच संघातील अधिकार कपात आणि चौकशी आदेशांमुळे वातावरण आधीच तापले होते.

संघातील प्रशासकीय निर्णयांवरून दोन्ही गटांमध्ये निम ाण झालेला तणाव दिवसेंदिवस वाढत गेला. काही अधिकार कमी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर आणि चौकशीचे आदेश दिल्यानंतर संघात अस्वस्थता निर्माण झाली होती. त्यातूनच आजच्या संचालक मंडळ बैठकीत अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आला आणि तो बहुमताने मंजूर झाला.

या निर्णयानंतर पानसरे यांनी तीव्र प्रतिक्रिया देताना



थेट पणनमंत्र्यांवर आरोप केले. आपल्याला पदावरून दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते, तसेच महासंघात कामकाजात अडथळे आणले जात होते, असे त्यांनी म्हटले. ''अजितदादांनी केलेल्या नियुक्तीमुळे राजीनामा देण्याचा प्रश्न नव्हता. मात्र संघातील अडथळे दूर व्हावेत म्हणून मी स्वतःहून बाजूला होण्याचा निर्णय घेतला,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अविश्वास प्रस्तावाच्या मंजुरीनंतर पणन संघातील सत्तासमीकरणे पूर्णतः बदलली असून पुढील अध्यक्षपद कोणाकडे जाणार याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

दैनिक
# जनता आवाज
अहिल्यानगर, शनिवार, दि. १३ जून २०२६ पान नं. ८

# पानंद रस्त्यांमध्ये अडथळे आणणाऱ्यांवर कारवाई

**आमदार विक्रम पाचपुते यांची पत्रकार परिषदेत माहिती**



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १४३ तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ अंतर्गत शेत पानंद रस्ते खुले करण्यासाठी शासनाने कठोर तरतुदी लागू केल्या असून, खुले करण्यात आलेल्या रस्त्यांमध्ये पुन्हा अडथळे निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आमदार विक्रम पाचपुते यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, शेत पानंद रस्ते खुले झाल्यानंतर त्यांची निशाणी काढून टाकणे, रस्ता बुजविण्याचा किंवा स्वतःच्या क्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे हा गंभीर कायद्याचा भंग मानला जाईल. अशा प्रकरणांमध्ये संबंधित शेतकऱ्यांचे आधार कार्ड व ॲग्री-स्टॅक नोंदणी पाच वर्षांसाठी निलंबित केली जाऊ शकते. तसेच त्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांपासूनही वंचित राहावे लागू शकते.

शेतकऱ्यांना कायद्याच्या तरतुदींची माहिती व्हावी आणि भविष्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अनेक वेळा कायद्याची माहिती नसल्याने चुका घडतात. त्यामुळे शेत पानंद रस्ते कायमस्वरूपी खुले राहावेत यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

श्रीगोंदा तालुक्यात आतापर्यंत सुमारे ५४ किलोमीटर शेत पानंद रस्ते सामंजस्याने आणि संबंधित समित्यांच्या सहकार्याने खुले करण्यात आले आहेत. सर्व शेतकऱ्यांनी असेच सहकार्य कायम ठेवल्यास तालुक्यातील उर्वरित शेत पानंद रस्तेही लवकरात लवकर खुले होतील आणि श्रीगोंदा तालुका राज्यात या योजनेत आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची वहीतुला

## प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची अनोखी भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी एकत्रित येऊन वह्यांची भेट दिली. मंत्री विखे-पाटील यांची वहीतुला करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने बुके, हार आणि इतर भेटवस्तू यांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून या निधीचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक साहित्यासाठी करावा, असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून कार्यकर्ते, संस्था आणि ना. विखे-पाटील यांच्या हितचिंतकांनी या अनोख्या पद्धतीच्या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला असून, गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात शालेय साहित्य संकलित झाले आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनीही गरजू



विद्यार्थ्यांकरिता वह्या भेट देऊन या उपक्रमामध्ये योगदान दिले आणि मंत्री विखे-पाटील यांना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या. मंत्री विखे-पाटील यांची वहीतुला करण्यात आली. अतिशय साध्या पद्धतीने शुभेच्छांच्या झालेल्या या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे-पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे-पाटील, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, उपसभापती अण्णासाहेब कडू, संचालक राहुल धावणे, मीनाक्षी निर्मळ, संचालक किशोर नावंदर, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, सौ.लीलावती सरोदे, डॉ. महेश खर्डे यांच्यासह विविध शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याची भूमिका मंत्री विखे-पाटील यांनी मांडली आहे. वाढदिवसाचा कोणताही डामडौल न करता सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा त्यांनी कायम ठेवली आहे.

### आशीर्वादामुळे कार्याला उर्जाः विखे

'वाढदिवसाच्या दिवशी मी लोणीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे शुभेच्छा देण्यासाठी कोणीही येऊ नये, अशी विनंती ना. विखे-पाटील यांनी कार्यकर्ते आणि हितचिंतकांना केली असून आपल्या सर्वांच्या शुभेच्छा आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी असल्यामुळेच कार्य करण्यासाठी सातत्याने मला ऊर्जा मिळते. वाढदिवसाचा कोणताही कार्यक्रम न करता यंदाच्या वर्षी गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमात योगदान देण्याचे आवाहन मंत्री विखे-पाटील यांनी केले आहे.'

# कत्तलीसाठी जाणारी जनावरे पकडली

## दोघांविरुद्ध गुन्हा दाखल; करंजी घाट परिसरातील घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** गोवंश जातीची जनावरे कत्तलीच्या उद्देशाने अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर गोरक्षकांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे करंजी घाट परिसरात मोठी कारवाई उघडकीस आली.

एका छोटा हत्ती मालवाहू वाहनातून एक गाय व दोन गोऱ्हे यांची वाहतूक होत असल्याचे आढळून आल्यानंतर वाहनासह जनावरे ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिक्षक कॉलनी, पाथर्डी येथील ओमकार शहादेव खेडकर यांना गुरुवारी (दि. ११ जून) पहाटे एक वाजण्याच्या सुमारास त्यांच्या गोरक्षक मित्रांकडून संशयास्पद गोवंश वाहतुकीची माहिती मिळाली. माहिती मिळाल्यानंतर करंजी घाट परिसरात पहारा ठेवून संशयित वाहनाचा शोध घेत असताना अहिल्यानगरकडून येणारे एमएच-१२-डब्ल्यूएक्स-११६० क्रमांकाचे छोटा हत्ती वाहन आढळून आले. गोरक्षकांनी वाहनचालकाला वाहन रस्त्याच्या कडेला थांबविण्यास सांगितले.

वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये गोवंश जातीची एक गाय आणि दोन गोऱ्हे अत्यंत कमी जागेत दोरीने बांधून ठेवण्यात आल्याचे दिसून आले. चौकशी दरम्यान वाहनातील व्यक्तींनी आपली नावे महादेव रामचंद्र पिलाने (वय ४२, रा. वीर, ता. पुरंदर, जि. पुणे) आणि अनिल प्रल्हाद जाधव (वय ३८, रा. तुळजापूर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी सांगितली. जनावरांबाबत विचारणा केल्यानंतर ती कत्तलीसाठी नेली जात असल्याचे समोर आल्याचा दावा फिर्यादीने केला आहे.यानंतर संबंधित वाहन, जनावरे आणि दोन्ही व्यक्तींना पाथर्डी पोलिस ठाण्यात आणण्यात आले.

# अकोलेचे ग्रामपंचायत अधिकारी खेडकर निलंबित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील अकोले ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी भगवान भिवसेन खेडकर यांना ग्रामस्थाला मारहाण केल्याच्या प्रकरणात जिल्हा परिषद प्रशासनाने निलंबित केले आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी याबाबतचा आदेश १० जून रोजी जारी केला.मागील आठवड्यात अकोले ग्रामपंचायत कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली हालचाल रजिस्टरच्या नोंदीची छायांकित प्रत मागण्यासाठी आलेल्या एका ग्रामस्थाला ग्रामपंचायत अधिकारी भगवान खेडकर यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. तसेच विविध वृत्तपत्र,वृत्तवाहिन्यांवरही या घटनेचे वृत्त प्रसारित झाल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांच्या अहवालाच्या आधारे जिल्हा परिषद प्रशासनाने प्राथमिक चौकशी केली. त्यामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियमाचे उल्लंघन झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने भगवान खेडकर यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अंतर्गत अधिकारांचा वापर करून भगवान खेडकर यांना ग्रामपंचायत अधिकारी पदावरून तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय पंचायत समिती अहिल्यानगर येथे निश्चित करण्यात आले आहे.

# वाळूच्या खड्ड्यांनी घेतला तरूणाचा बळी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** नदीपात्रातील अवैध वाळू उपशामुळे निर्माण झालेल्या खोल खड्ड्यात बुडून राहुल अशोक बर्डे (वय २०) या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील कान्हेगाव येथे घडली असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अवैध वाळू उत्खनन रोखण्यात प्रशासनाला आलेले अपयश आणि त्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे हा बळी गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

कान्हेगाव, लाख, जात व करजगाव परिसरातील प्रवरा नदीपात्रातून गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिक सातत्याने करत आहेत. या बेकायदेशीर उत्खननामुळे नदीपात्रात अनेक ठिकाणी मोठमोठे व खोल खड्डे निर्माण झाले आहेत. सध्या पिण्याच्या पाण्यासाठी सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे बांधारा भरलेला असल्याने हे खड्डे पाण्याखाली झाकले गेले आहेत. दरम्यान, राहुल बर्डे हा मेंढ्यांना पाणी पाजण्यासाठी नदीकाठी गेला असता त्याचा पाय घसरून तो अशाच एका खोल खड्ड्यात पडला. पाण्याची खोली अधिक असल्याने त्याला बाहेर पडता आले नाही आणि त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अवैध वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस प्रशासनाकडे अनेकदा लेखी व तोंडी तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रभावी कारवाईचा अभाव असल्याने वाळू उपसा सुरूच राहिला. परिणामी नदीपात्र धोकादायक बनले असून आता एका निष्पाप युवकाला जीव गमवावा लागला आहे.

### घटनेची सखोल चौकशीची मागणी

या घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून संबंधित वाळू तस्करांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व प्रवरा बचाव कृती समितीने केली आहे.

# 'लोकशाही वाचवण्यासाठी समविचारी पक्षांनी एकत्र यावे'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांची विचारधारा एकच आहे. दोन्ही पक्षांच्या विचारधारेमध्ये फरक नाही. ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्रजी पवार हे कधीही प्रतिगामी विचारधारा स्वीकारणार नाही. देशाची लोकशाही व संविधान धोक्यात आले असून ते वाचवण्यासाठी सर्व लोकशाही मानणाऱ्या समविचारी पक्षांनी एकत्र आले पाहिजे, असे मत महाराष्ट्र काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले आहे.



संगमनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या काँग्रेसमध्ये विलीनीकरणाबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना काँग्रेसचे माजी प्रांताध्यक्ष लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची विचारधारा एक आहे. लोकशाही, राज्यघटना, संतांचा, बहुजनांचा आणि पुरोगामी विचार असलेली ही विचारधारा आहे. आमच्या विचारधारेमध्ये फरक नाही. ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार कधीही प्रतिगामी विचारधारा स्वीकारणार नाही, असे माझे मत आहे. ही लढाई विचारधारेची आहे. सध्या देशांमध्ये लोकशाही, संविधान धोक्यात आले आहे. न्यायव्यवस्थेवर दबाव आहे, पत्रकारितेमध्ये आपल्या देशाचा नंबर आता १५७ वा आहे. निवडणूक आयोगाबद्दल काय बोलणार. अशी सगळी परिस्थिती असताना लोकशाही आणि संविधान मानणाऱ्या सर्व पक्षांनी पहिला देश आणि लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र आले पाहिजे. आणि ती जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे.

### ..आता चांगले शोधण्याची वेळ

प्रत्येक क्षेत्रामध्ये दोष असतात पण दोष किती असावे याचे प्रमाण असते. आता फक्त दोष शिल्लक राहतात की काय अशी अवस्था सध्या सरकार आणि राजकारणामध्ये आहे. जास्त दोषांमुळे चांगले शोधण्याची वेळ आली आहे. पूर्वी दोष शोधले जायचे आता चांगले शोधावे लागत आहे. याचबरोबर सध्याचे राजकारण हे दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले.

# वादळाने तुटलेल्या तारा, वीज खांब दुरुस्त करा


## आ. विवेक कोल्हे : अनेक गावांतील वीजपुरवठा विस्कळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यात ६ जून रोजी झालेल्या वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी वीज खांब कोसळून विद्युत वाहक तारा तुटल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे शेतकरी व नागरिकांसमोर पाणीपुरवठ्यासह विविध अडचणी निर्माण झाल्या असून तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी महावितरणकडे केली आहे.

संगमनेर येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्रात





आ. कोल्हे यांनी रवंदे, दहेगाव बोलका, खिर्डी गणेश, चासनळी आणि संबंधित सबस्टेशनअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये वीज यंत्रणेचे मोठे नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने जनावरांच्या पाण्याची, पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या कामांची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित गावांमध्ये महावितरणचे कर्मचारी तातडीने पाठवून तुटलेल्या तारांची दुरुस्ती करावी आणि नवीन वीज खांब उभारावेत, अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी व नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने आवश्यक त्या सूचना देऊन कार्यवाही करावी, अशी विनंतीही आ. कोल्हे यांनी महावितरण प्रशासनाकडे केली आहे.

# अतिरिक्त तहसील कार्यालयांसाठी सूचनांची मागणी

## राजूर, घोडेगाव येथे होणार नव्याने कार्यालये

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तालुक्यातील राजूर तसेच नेवासा तालुक्यातील घोडेगाव ही दोन्ही प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालये स्वातंत्र्यदिनापूर्वी कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. या कार्यालयांबाबत हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

तालुक्यातील राजूर येथे अतिरिक्त कार्यालयाला या पूर्वीच मंजुरी मिळालेली आहे. या अतिरिक्त तहसील कार्यालयाबाबत १५ दिवसांची जाहीर सूचना गुरुवारी प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्याबाबत संबंधिताना निर्देश देण्यात आले आहेत. प्राप्त हरकती व सूचनांच्या प्रती शासनास सदर न करता त्यांचे दैनंदिन संकलन व तपासणी, विश्लेषण करून सदर हरकती व सूचनांबाबतचे अभिप्राय १ जुलैपर्यंत शासनास सदर करावयाचे आहे. राजूर येथील प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालयाबाबत ही सर्व जबाबदारी उपविभागीय अधिकारी संगमनेर यांच्यावर सोपवण्यात आली आहे. अकोले तालुक्यात एकूण १२ महसूल मंडळे आहेत. त्यातील राजूर, साकिरवाडी, वाकी, शेंडी, कोतुळ व खिरविरे ही महसूल मंडळे राजूर येथील अतिरिक्त तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणार आहेत तर अकोले, रुंभोडी, समशेरपूर, वीरगाव, लिंगदेव, ब्राह्मणवाडा ही महसूल मंडळे अकोले तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राहतील. नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील प्रस्तावित अतिरिक्त तहसील कार्यालयाच्या निर्मितीबाबतही अशीच कार्यवाही सुरू झाली आहे.

# अंजनापूर ग्रामस्थांचे प्रश्न प्राधान्याने सोडविणार

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया; ग्रामसंवाद कार्यक्रमात दिली ग्वाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यातील अंजनापूर येथे आयोजित ग्रामसंवाद कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध समस्यांवर सर्व शासकीय विभागांशी समन्वय साधून जास्तीत जास्त प्रश्न मार्गी लावले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आमदार आशुतोष काळे उपस्थित होते.

उपलब्ध विकासनिधी व तांत्रिक बाबींचा विचार करून गावातील प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी डॉ. बाबासाहेब कोळेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार महेश सावंत, सरपंच कविता गव्हाणे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधांवर प्रामुख्याने चर्चा झाली.



जिल्हाधिकारी म्हणाले, गावांतर्गत रस्ते तसेच कोपरगाव-संगमनेर रस्त्याची दुरवस्था दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही केली जाईल. महावितरणच्या रोहित्रांबाबत वारंवार उद्भवणाऱ्या समस्या तसेच पाणीवाटपाशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महसूल प्रशासन सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीनुसार गावात एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण केवळ सातशे ते आठशे इतके असल्याची बाब अत्यंत चिंताजनक असून, ग्रामपंचायत व प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचरा विलगीकरण अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी नव्याने मंजूर झालेल्या ४६ ट्रॅक्टरपैकी काही ट्रॅक्टरच्या चाव्या, आत्मा अंतर्गत पीक प्रात्यक्षिकासाठी बियाणे तसेच विविध शासकीय योजनांचे लाभ प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले.

### जलसिंचन योजनेचा मोठा फायदा

आमदार काळे म्हणाले, अंजनापूर व परिसरातील गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी निळवंडे प्रकल्प, गोदावरी कालवा व उजनी उपसा जलसिंचन योजनेचा मोठा फायदा होत आहे. भाविकांमुळे सावळीविहीर ते कोल्हार मार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी झगडे फाटा ते तळेगाव दिघे राज्य मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याची गरज आहे. राज्य शासनाकडून वीस कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेल्या या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने मार्गी लावावे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.